परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ११२ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०१७

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सस्नेह नमस्कार.***

सन २०१७ डिसेंबरमधील 'हितगुज'चा हा शेवटचा अंक 'मासानाम् मार्गशीर्षोऽम्' अशा पवित्र मार्गशीर्ष महिन्यात प्रसिद्ध होत आहे.

मंडळी, आता छान थंडी पडू लागली आहे. वातावरणात गुलाबी गारवा पसरत आहे. जोडीला धुके आहे, दव आहे, शाली, स्वेटर्स, मफलर, कानटोपी यांनी देहाला लपेटण्याचे सुखद दिवस आले आहेत. शेकोटी, पोपटी, हुरडा पार्टी, सहली, ट्रेकिंग, गिरीभ्रमण, नाच, गाणी असे आनंदी क्षण देण्यास हा हिवाळा उत्सुक आहे. आपले कुलसंमेलनही अशा हिवाळ्यात भरत आहे. बडोदे येथे दि. ७ जानेवारी २०१८ ला रविवारी, संमेलनात सहभागी होण्यासाठी तत्पर राहू या. स्नेहमीलनाचा, जिव्हाळ्याचा आनंद लुटू या. परस्परांशी 'हितगुज' करू या. माहेरवाशिणींनी मोठ्या संख्येने संमेलनात सहभागी व्हावे. त्यांच्या येण्याने आपल्या कार्याची म्हणजे संमेलनाची शोभा वाढते. अकरावे अखिल भारतीय मराठे कुलसंमेलन बडोदेनगरीत मोठ्या उत्साहात साजरे करू या. या बडोद्यातच मराठे प्रतिष्ठानचे बीज रूजले म्हणून या संमेलनाला विशेष महत्त्व आहे.

युगदृष्ट्या सयाजीराव गायकवाड महाराजांच्या बडोदेनगरीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि १६ ते १८ फेब्रुवारी २०१८ ला भरत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बडोद्यात होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. परंतु त्याआधी आपले अखिल भारतीय मराठे ११ वे कुलसंमेलन बडोद्यात भरत आहे. बडोदेनगरी सांस्कृतिक संमेलनांनी दुमदुमून जाणार आहे. संमेलन यशस्वी होण्यासाठी बडोदेकर मराठे कुलबांधव मोठ्या उत्साहाने तयारीला लागले आहेत. असो.

या अंकात श्री. प्रफुल्ल खांबेटे यांचा 'असमानता हाच न्याय?' हा लेख विचार करायला लावणारा आहे. श्री. सुधाकर मराठे लिखित, 'जादुई स्वरांची बेगम' – शमशाद बेगम यांच्यावरील उत्कट ललित लेख म्हणजे एक भावमधुर कविताच आहे. ज्ञानेश्वरांनी ओंकारावर केलेले गणेशरूपी शब्दब्रह्माचे रूपक सौ. माधवी जाईल यांनी सुंदररित्या शब्दरूप केले आहे. श्री. नंदकुमार मराठे यांचा सहस्रचंद्रदर्शन लेख माहितीपूर्ण आहे. श्री. कालिदास मराठे यांचा 'आपले हमो' हा ह.मो. मराठे यांच्यावरील मृत्यूलेख सविस्तर आणि ह.मो.च्या व्यक्तिमत्त्वाला

## हार्दिक निमंत्रण

### मराठे प्रतिष्ठानचे कपिगोत्री परिवाराचे

**अकरावे अखिल भारतीय मराठे कुलसंमेलन, बडोदे (गुजरात) रविवार दि. ७ जानेवारी २०१८ला, नटराज मंगल कार्यालय, दांडिया बाजार, बडोदे येथे सकाळी ८ ते रात्री ८ या वेळात संपन्न होणार आहे. संमेलन शुल्क प्रतिव्यक्ती रु.५००/- (रु. पाचशे) असेल. या विषयी सविस्तर माहितीपत्रक यापूर्वीच पाठविले होते ते मिळाले असेलच. तरी कुलबांधवांनी संमेलनास उपस्थित राहून कार्याची शोभा वाढवावी, ही विनंती. ज्या कुलबांधवांना दिवाळी शुभेच्छा पत्रे व त्यासोबतचे संमेलनाविषयीचे माहितीपत्र मिळाले नसेल त्यांनीही संमेलनास आवर्जून यावे, असे आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. मोहनराव मराठे कळवित आहेत.**

*संपर्कासाठी श्री. मोहनराव विष्णूपंत मराठे(पृ.४२२), बडोदे (विश्वस्त मराठे प्रतिष्ठान) • भ्रमणध्वनी : ९८२५०५५७७१*

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

आणि लेखनाला सर्वांगीण न्याय देणारा असा उतरला आहे. 'माझ्या आठवणींतील चेंबूर', 'पन्नाशीत पन्नास किल्ले', वर्षागीते, बंदी भाऊ परब इत्यादी चांगले लेख वाचनीय आहेत. श्री. माधव मराठे, पुणे यांनी लोणी येथील राजबागेत गेलेल्या सहलीचे केलेले वर्णन प्रत्ययकारी आहे. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. विजय मराठे यांनी ही सहल उत्तमपणे आयोजित केली होती.

आपले ज्येष्ठ कुलबांधव लेखक, निवृत्त कारागृह अधिकारी श्री. अच्युत म. चक्रदेव यांच्या उत्कट इच्छेला मान देऊन, 'दोन दत्तावतार : श्रीपादश्रीवल्लभ स्वामी यांच्यावर मी लेख लिहिला आहे. तसेच पुण्यातील ज्येष्ठ कुलबांधव श्रीराम मराठे आणि श्रीरंग मराठे यांनीही दत्त संप्रदायावर 'हितगुज'मध्ये मी लिहावे अशी अपेक्षा खास दूरध्वनी करून व्यक्त केली आहे. संतसाहित्य आणि पारमार्थिक वाङ्मय वाचणारे त्याची आवड जोपासणारे अभिरूचीसंपन्न वाचक 'मराठे' हे आपले कुलबांधव आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणे सातासमुद्रापार अमेरिकेत न्यूजर्सी राज्यातील वेस्ट विंडसर इथे पहिले मराठी महापौर श्री. हेमंत मराठे यांनी मोठ्या बहुमताने निवडून येण्याचा मान पटकाविला, ही निश्चितच मराठे परिवाराला अभिमान वाटावी अशी गोष्ट ठरते. समस्त मराठे परिवाराचा उर अभिमानाने भरून आला आहे. असो. आपल्या कुलबांधवांना येणारे नवीन वर्ष भरभराटीचे सुखाचे, आरोग्यसंपन्न जावो ही शुभेच्छा.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. १९ नोव्हेंबर २०१७)



**पहिले पारितोषिक : श्री दत्तात्रेय मराठे, रत्नागिरी**



**द्वितीय पारितोषिक : श्री. अजित वामन मराठे, ठाणे**



**तृतीय पारितोषिक : श्री. अनंत मराठे, अंधेरी, मुंबई**

## नांदा सौख्यभरे



अहमदाबाद येथील आपल्या प्रतिष्ठानचे सभासद श्री. नुपूर मराठे (मीना मराठे यांचे सुपुत्र व दत्तात्रेय उर्फ DK मराठे यांचे पुतणे) यांचा शुभविवाह चि. सौ. कां. रुची, श्री. विलास व प्रीता जुन्नरकर यांची सुकन्या हिजसमवेत दि. २१ नोव्हेंबर २०१७ रोजी अहमदाबाद येथे संपन्न झाला. **मराठे प्रतिष्ठानद्वारा वधुवरांस अनेक शुभाशीर्वाद.**

# ‘‘दुर्गासुराचा वध - नवरात्र पद्धत सुरू’’

• सौ. विजया का. मराठे, (पृ.५३१), म्हापसा-खोर्ली (गोवा)

हिरण्यकश्यपू व हिरणाक्ष हे कश्यपाचे पुत्र. या दोघांना दोन पुत्र झाले. हिरण्यकश्यपुचा पुत्र प्रल्हाद हरिभक्त होता. हिरण्याक्षचा पुत्र रौरव हा दैत्य होता. रौरवसुरांचा पुत्र ‘‘दुर्गासूर.’’ याने तप करून ब्रह्मदेवास प्रसन्न करून घेतले. ब्रह्मदेवाने दुर्गासुराला वर दिला की, ‘‘तू त्रैलोक्याचा अधिपती होशील. तुला जिंकणारा असा वीर त्रिभुवनात असणार नाही. विष्णू, ब्रह्मदेव, शंकर यांचा तू पराभव करशील. याप्रमाणे ब्रह्मदेवाने वरदान देताच दुर्गासुरास परम संतोष झाला.



दुर्गासुरास इंद्राला जिंकण्याची इच्छा झाली. शुक्राचार्य राक्षस सेनेचा सेनाधिपती होता. त्याला संजीवनी विद्या ठाऊक होती. त्याने दुर्गासुराला पृथ्वी जिंकण्यास उतावीळ केले. त्यावेळी मोठमोठे दैत्य आपल्या सेनेसह दुर्गासुरास साह्य करण्यास आले. त्यांनी अमरपुरीवर स्वारी केली. इंद्राने पण युद्धाची तयारी केली. तेहतीस कोटी देव तयार होऊन आले. देव गुरू बृहस्पती आला. युद्ध सुरू झाले.

देवाचा पुष्कळ नाश होऊ लागला. तेव्हा द्रोणागिरीची अमृतवल्ली आणून बृहस्पती इंद्राची सेना सजीव करू लागला. हे शुक्राचार्याने दुर्गासुरास सांगितले. दुर्गासुराने बृहस्पतीस औषध घेऊन येत असता त्याला पकडून पाताळात नेले. त्यामुळे देवाचे अवसान खचून हातपाय गळले. शेवटी देवांचा मोड. दुर्गासुरांनी अमरावती खालसा केल्याची बातमी महादेव, विष्णूस कळवावी. या भानगडीत पडण्याची गरज नाही. मृत्यु लोकांचे सर्व राजे जिंकले. पण ‘वाराणशी’ खालसा करायची राहून गेली. तेथे शंकर, विष्णू व ब्रह्मदेव मिळतील व त्रिभुवनाचा राजा तूच होशील, असे शुक्राचार्यांनी दुर्गासुरास सांगितले. दुर्गासुराने वाराणशीवर चाल केली.

पुरुषाच्या हातून दुर्गासुरास मरण येऊ नये असा ब्रह्मदेवाचा त्यास वर होता. यास्तव तिन्ही देवांनी पार्वतीची योजना केली. शिवाची सर्व शस्त्रे, भूषणे घालून दुर्गासुराचा वध करण्यासाठी पार्वती रथारूढ झाली व वाराणशीच्या वेशीपाशी आली. अठ्ठ्याऐंशी काळरात्री बरोबर घेतल्या.

युद्धात मेलेले राक्षस शुक्राचार्य उठवी हे पाहून कोटराक्षी पुढे झाली. देवाचा गुरू बृहस्पतीची मानहानी झाली. देव बंदीत पडले. ते उसने फेडण्यासाठी तिने शुक्राचार्यास धरून गुप्तस्थानामध्ये लपवून ठेवले. त्यामुळे राक्षस दुर्बल होऊन मरण पावले. मग दुर्गासूर युद्धास तयार झाला. भवानी अग्निदत्त रथात बसली. हातात चक्र धनु घेतले होते. हे पाहून दुर्गासूर थरथर कापू लागला. तो तिला म्हणाला, तुला युद्धात पाठवून शिवाने आपले संरक्षण केले. ‘‘धिक्कार असो पुरुषार्थाचा.’’ पूर्वी रावणासी प्रसंग पडला तेव्हां असेच केले होते. भस्मासूराला पाहून दोन हजार वर्षे लपून राहिला. सर्व देवाना मी जिंकून अटकेत ठेवले आहे. मग तुला काय?

अशा तऱ्हेने दुर्गासूराने यथेच्छ तोंडसुख घेतले. तेव्हा भवानीने त्याला सांगितले की, तुझ्या अंगी एक अवगुण आहे. तुला काशीची आठवण नाही. पूर्वी त्रिपूर दैत्याने काशीमध्ये लिंगाची स्थापना केली. तुला मुर्खाला बोध करून काय उपयोग तरी तरी शिवाच्या शक्तीने अकस्मात वध केला, असे होईल म्हणून तुला समजूत दिली.

तुझा पूर्वज प्रल्हाद शिवाची पूजा करी. त्याच्या वंशात तू असा कसा दुष्ट निघालास असे ऐकून दुर्गासूरास क्रोध आला व भयंकर युद्ध झाले. भवानीने दुर्गासुराचा वध केला. हे युद्ध अश्विनी प्रतिपदेपासून अहोरात्र नऊ दिवस चालले होते. तेव्हापासून नवरात्र पद्धत सुरू झाली. सर्व देव मुक्त झाले. देवांनी भवानीवर पुष्पवृष्टी केली. या दुर्गासुरावरून तिचे नाव दुर्गादेवी ठेवले.

❖


### सुविचार

कष्ट केल्याने दारिद्र्य नाहीसे होते.
धर्माचरणाने पाप नाहीसे होते आणि
मौनामुळे कलह नाहीसे होतात.

*– आर्य चाणक्य*

# आपले हमो

• कालिदास बा. मराठे (पृ. ५४१), गोवा भ्रमणध्वनी – ९४२३८८२२९०



२ ऑक्टोबर २०१७ मराठे परिवारातील घराणे क्रमांक ७१ मधील श्री. हनुमंत मोरेश्वर मराठे यांचे दुःखद निधन झाले.

मराठी साहित्य विश्वातील आणि पत्रकारीता विश्वातील आपल्या कामगिरीने अजरामर झालेल्या साहित्यिक आणि पत्रकार ह.मो.ना आपण गमावले. गेल्या सहा महिन्यापासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती.

विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच या प्रतिष्ठानचे काम पंचवीस पुस्तिका प्रकाशित करून त्यांनी फेब्रुवारी २०१७ मध्ये थांबवायचा मनोदय व्यक्त केला होता.

या प्रतिष्ठानचे काम त्यांनी २००५ मध्ये सुरू केले होते. आपणास कोणत्याही जातीच्या श्रेष्ठत्वाचे कौतुक करावयाचे नाही, उलट समाजात दिसत असलेले जातीमधील वैर संपुष्टात आणणे अधिक महत्त्वाचे आहे अशी भूमिका ते वारंवार मांडीत राहिले.

परंतु या प्रतिष्ठानच्या कामामुळे गैरसमज निर्माण केलेल्या काही मुठभर लोकामुळे त्यांना ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीतुन माघार घ्यावी लागली हे सत्य 'महाराष्ट्र टाइम्स' कारांनी आपल्या अग्रलेखात 'मध्यमवर्गाचा आरसा' (३-१०-२०१७) मध्ये मांडले आहे. ते म्हणतात ''साहित्य आणि पत्रकारीता या दोन्ही क्षेत्रात आपला ठसा उमटवणारे ह.मो. चिपळूणच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाच्या रिंगणात उतरले. त्यावेळेस त्यांचा विजय निश्चित समजला जात होता. मात्र ब्राह्मणांच्या समर्थनार्थ त्यांनी घेतलेल्या भूमिकेचा बाऊ केला गेला.''

श्री. समीर गायकवाड यांनी याबाबतीत म्हटले आहे की, साहित्यिक जगतातील मुठभर बुणगे देखील ह.मो.च्या बाजुने ठाम उभे राहिले नाहीत की ब्राह्मण समाजही त्यांच्या पाठीशी ठासून उभा राहिला नाही. त्यांच्या वैचारिक भुमिकेला आपली वैचारिक भूमिका मांडून प्रतिकार करायला हवा होता.

व्यक्ती गेल्यानंतर तिची महानता कळते हेच खरे. त्यांच्या निधनानंतर गोमंतकातील आणि महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी योग्य दखल घेतली आणि त्यांच्या कामगिरीचे यथार्थ मूल्यमापन केले आहे.

महाराष्ट्र टाइम्सच्या ८/१०च्या अंकात श्री. श्रीकांत बोजेवार यांनी 'दोन भाष्यकार' या लेखात पत्रकारिता हा तसा थकवणारा आणि राबवणारा व्यवसाय आहे. कार्यक्रमातून बाहेर पडल्यावरही हार्मोनियमने सूर धरावा तसा कामाचा, नियोजनाचा एक सूर डोक्यात सतत वाजत असतो. अशा व्यवसायात असूनही साधूनी आणि मराठेनी केलेले प्रचंड लिखाण आणि त्यातील वैविध्य थक्क करणारे आहे.''

दैनिकात अनेक वर्षे नियमाने सदर चालविण्याचा विक्रमही ह.मो.च्या नावावर लिहिला जावा इतके विपुल लेखन त्यांनी केले आहे, असे मत महाराष्ट्र टाइम्सकारांनी आपल्या अग्रलेखात व्यक्त केले आहे.

'असे ह.मो. मराठे यापुढे होणे नाही' या डॉ. नंदकुमार कामत यांमी ४/१०च्या 'गोवनवार्ता' या दैनिकात लिहिलेल्या लेखात त्यांच्या 'बालकाण्ड' या आत्मकहाणीला नोबेल पारितोषिक मिळायला हवे होते. या २००१ साली व्यक्त केलेल्या अभिप्रायाची आठवण करून दिली आहे. आणि त्यांना तिनदा पद्मभूषणसारखा पुरस्कार द्यायला हवा असेही मत मांडले आहे.

डॉ. सदानंद मोरे यांनी 'ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर वाद मिटावा यासाठी हमो प्रयत्नशील होते आणि त्यातूनच प्रलोभन करणारी पुस्तके त्यांनी लिहिली.'

विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच या प्रतिष्ठानतर्फे ज्या २५ पुस्तिका प्रकाशित झाल्या त्यामध्ये १२ पुस्तिका त्यांनी लिहिल्या असून उरलेल्या तेरा इतर लेखकांकडून लिहून घेतल्या आहेत.

परंतु सन १९६९ मध्ये 'साधना' दिवाळी अंकातून लिहिलेल्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या पहिल्या लघु

कादंबरीमुळे ते लेखक म्हणून पुढे आले. त्यांच्या साधनाच्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेल्या 'काळेशार पाणी' या कादंबरीवर अश्लील कादंबरी म्हणून खटला करण्याचा विचार पुढे आला. त्यावेळी साधनाचे विश्वस्त श्री. एस.एम. जोशी यांनी हा खटला सर्वोच्च न्यायालयापर्यंत आम्ही लढवू असे जाहिर केले. याचा अनुवाद डार्क वॉटर म्हणून लीला बावडेकर यांनी केला आहे.

त्यानंतर हमोची पत्रकारीतेची कारकीर्द ज्यामध्ये 'किर्लोस्कर', 'मार्मिक', 'लोकप्रभा', 'नवशक्ती', 'पुढारी', घरदार मधील संपादनाचा अनुभव त्यांनी आपल्या 'मधलं पान' या पुस्तकातून मांडला आहे.

२००१ मध्ये त्यांची 'बालकाण्ड' ही आत्मकहाणी प्रसिद्ध झाली आणि परत एकदा मराठी साहित्य विश्वात खळबळ उडाली. रसिक वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. 'ललित' मासिक दरवर्षी वाचक शिफारस प्रसिद्ध करीत असते. त्यामध्ये २००१ साली 'बालकाण्ड' पहिल्या क्रमांकावर आणि २००७ साली बालकाण्ड या पुढचा भाग 'पोहरा' (ज्याला एका रसिकाने युवाकाण्ड म्हटले आहे) पण 'ललित' वाचक शिफारसमध्ये पहिल्या क्रमांकावर आले. त्यांनी त्याचा पुढचा भाग 'प्रौढ काण्ड' लिहायला हवा होता.

मार्च २०१६ मध्ये त्यांनी स्वतःच बाळकाण्ड आणि पोहरा या पुस्तकावर आलेली समीक्षा आणि वाचकांनी लिहिलेली पत्रे (ज्याला त्यांनी समांतर समीक्षा आहे म्हटले आहे) एकत्र करून बाळकाण्ड आणि पोहरा : समीक्षा आणि समांतर समीक्षा या शिर्षकाखाली पुस्तक प्रसिद्ध केले व त्याच्या प्रती सर्व समीक्षा करणाऱ्या लेखकांना आणि पत्रलेखकांना पाठवल्या. (ज्याचा परिचय मी याच पत्रिकेत सप्टेंबर २०१६ अंकात दिला होता.)

या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी बाळकाण्ड, पोहरा आणि बाळकाण्ड पोहरा : समीक्षा आणि समांतर समीक्षा या तिन्ही ग्रंथाचा मिळून महाग्रंथ काढावा अशी इच्छा व्यक्त केली होती.

त्यांच्या तिसऱ्या ग्रंथाचा परिचय करून देताना मी म्हटले होते की आपण वाचक पुढे आलो तर ही इच्छा पूर्ण होऊ शकते. परंतु फारच कमी वाचकांनी प्रतिसाद दिल्याने ही इच्छा पूर्ण करता आली नाही. मला असे वाटते की पुढच्या मार्च २०१८ अथवा ३ ऑक्टोबर २०१८ पर्यंत ही इच्छा पूर्ण करणच्या दृष्टीने आपण काम करावे.

त्याचप्रमाणे 'बाळकाण्ड' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद व्हावा यादृष्टीने पण प्रयत्न व्हावेत.

हमोचा परिचय विश्वचरित्र कोशाच्या खंड तीनमध्ये संपादक श्रीराम कामत यांनी दिला. आहे. (आपल्या प्रतिष्ठानचे पहिले अध्यक्ष श्री. सुरेश मराठे यांचा परिचय पण दिलेला आहे.)

मराठी वाङ्मय कोश खंड २ (१९२०-२००३) मध्ये पण हमोचा परिचय दिला आहे.

आपल्या मराठे कुलवृत्तांत त्यांचा परिचय फारच त्रोटक आला आहे. जन्मसन पण चुकीचा दिला गेला आहे. (१९४२) प्रत्यक्षात २ मार्च १९४० हा त्यांचा जन्मदिवस आहे. पुढच्या आवृत्तीत तो सविस्तर द्यायला हवा.

परिशिष्ट १ मध्ये मी त्यांच्या पुस्तकांची यादी देत आहे.

**अ. कादंबरी** : १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी - १९७२ (पुस्तक रूपात), २. काळेशार पाणी (इंग्रजी अनुवाद Dark Water 'डोह' हा सिनेमा), ३. देवाची घंटा, ४. नो सेंटिमेंटस प्लीज, ५. इतिवृत्त, ६. प्रास्ताविक, ७. कुरूक्षेत्र, ८. सॉप्टवेअर, ९. मार्केट, १०. कलियुग, ११. नरिमन पॉईंटचा समुद्र

**आ. कथासंगह** : १. पक्षिणी १९७५, २. घोडा १९८४, ३. हद्दपार १९८०, ४. दाव १९७८, ५. वीज १९८५, ६. युद्ध १९८६, ७. सापेक्ष १९८६, ८. ज्वालामुख १९८७, ९. आजची नायिका १९९५, १०. न्युज स्टोरी - 'दोन स्पेशल' हे नाटक भारतीय ज्ञानपीठतर्फे त्यांच्या निवडक कथांचा 'कावा' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

**इ. आत्मकहाणी** : १. बाळकाण्ड, २. पोहरा, ३. मधलं पान

**ई. व्यक्तिचित्रण** : १. एक माणूस - एक दिवस भाग १, २, ३

**उ. वृत्तपत्रीय** : १. दिनमान, २. द बिग बॉस, ३. उलटा आरसा, ४. वंश विद्वेषाच्या वणव्यात श्रीलंका (१९८७)

**ऊ. प्रबोधनपर लेखन** : १. ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?, २. विद्रोही ब्राह्मण, ३. ब्राह्मण चळवळ कशासाठी?, ४. ब्राह्मणनिंदेची नवी लाट, ५. ब्राह्मणमानस (संकलन), ६. संत तुकारामाचा खून खरोखरच ब्राह्मणांनी केला असेल काय?, ७. गंध, झेंडी, जानवे आणि ब्राह्मण चळवळ, ८. ब्राह्मणेत्तर तरूणांनो, ही घ्या तुमच्या शंकाची उत्तरे!, ९. आधी रोखल्या बंदुका, आता उगारल्या बंदुका!, १०. ब्राह्मणांचे साहित्य प्रतिगामी आहे काय?, ११. इकडून तिकडून ब्राह्मण, १२. माझी भूमिका जातीयवादी आहे काय? श्री. शंकर सारडा यांनी १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी संहिता आणि समीक्षा, २. काळेशार पाणी - संहिता आणि समीक्षा ही दोन पुस्तके संपादित केली आहेत.

❖

# असमानता हाच न्याय?

• प्रफुल्ल ब. खांबेटे, टिटवाळा

भ्रमणध्वनी – ९८१९०९३४१५

''विविधतेत एकता'' हे भारताचे वैशिष्ट्य. ह्या विचाराचा उगम अध्यात्मातून झालेला असून द्वैताकडून अद्वैताकडे जाणे ह्या गीतेच्या शिकवणीची छाया आहे. सुख-दुःख, अंधार-प्रकाश, सुष्ट-दुष्ट इ. ह्या द्वैताच्या उलटसुलट बाजू चराचरात पावलोपावली आहेतच; एवढेच नव्हे तर ह्यालाच सृष्टीचा नियम आहे असे म्हणता येईल. एकाच पंखाने पक्षाला उडता येणार नाही, पॉझिटिव्ह निगेटिव्ह चार्ज मिळून विद्युत प्रवाह निर्माण होतो. पॉझिटिव्ह किंवा निगेटिव्ह फक्त एकाने विद्युत शक्ती निर्माणे होणे नाही. हा जो विरोधाभास आहे तोच स्त्री-पुरुष ह्या नात्यात निसर्गाला अपेक्षित आहे व त्यांच्या एकतेनेच समाज निर्माण होतो.

प्रत्येक देशाची, समाजाची काही वैशिष्ट्ये अथवा शक्तीस्थाने असतात की, त्या गुणांमुळे तो देश, समाज ओळखला जातो. तसेच पुरुष आणि स्त्री अगदी भिन्न-विरुद्ध गुण निसर्ग प्रदान करून जन्माला घालत असतो. त्याला आव्हान देण्यात काय हशील? पुरुषाची आक्रमकता तर स्त्रीची सोशिकता हीच शक्तीस्थाने आहेत. दोघांच्या गुणांचा अतिरेक झाला वा कमतरता झाली की घर्षण सुरू होते. सर्व प्राणिमात्रातही हे गुण प्रकर्षांनी दिसून येतात.

स्त्री-पुरुष दोघे एकमेकांच्या विरुद्ध गुण घेऊन समानता आणू इच्छितात आणि दोघेही दुःखी होऊन बसतात. कोणीतरी पुढे जातो तेव्हा त्याच्यामागे कोणीतरी असतातच. एखादा पुरुष कर्तृत्व करतो तेव्हा कुटुंबातील कोणीतरी त्याला पाठिंबा देत असतोच. ते एक सामूहिक कार्य असतं, नाव मात्र आघाडीवर असल्याचे अधिक होते. आघाडीवर कोणी जायचं हे मात्र सामाजिक बंधनं, सुरक्षितता, नैतिकता व कुवत ह्या छाननीतून नैसर्गिकरित्या घडत असतं. प्राचीन काळी स्त्रियासुद्धा शिक्षण घेत होत्या. मध्ययुगात सामाजिक असुरक्षिततेमुळे ते बंद पडलं होतं. तेही आता उत्तम रितीने सुरू झालंय. समानतेच्या बाबतीत बोलायचेच झाले तर दोन बहिणीत समानता नसते, दोन भावात समानता नसते. आई-वडीलदेखील दोन्ही मुलींना अथवा मुलांना समान न्याय देऊ शकत नाहीत. बायका कुठेही कमकुवत नाहीत हे फार पूर्वीच सिद्ध झालंय आणि आता तर इतकं सिद्ध होतंय की चांगल्या कामातच नाही तर अगदी कौटुंबिक, प्रशासकीय, सामाजिक गुन्हेगारीतसुद्धा त्या अग्रेसर आहेत. सासू-सून भांडणे तर जगजाहीरच आहेत. पण आता सुनेचाच छळ होतो असे नाहीतर सासूचा छळ होण्याच्याही घटना बऱ्याच घडत आहेत. बायकोचाच छळ होतो असे नसून कायद्याचा गैरवापर करून बायका नवऱ्यांना जेरीस आणत आहेत. नवऱ्यांना गुलाम करण्याच्या ह्या वृत्तीमुळे नवरे आत्महत्या न करता अल्पायुषी तरी होतात नाहीतर व्यसनी. स्त्रियांची गुन्हेगारी इतकी वाढलीय की त्या अत्याचार, हुंडा, बलात्कार इ. खोट्या आरोपांनी पुरुषांना लुबाडू पाहतात. 'कुटुंबकल्याण मंत्री' मनेका गांधी म्हणतात, ''पुरुषाच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढताहेत त्यांच्या तक्रारींची नोंद घेण्याचीसुद्धा प्रशासनाने काही व्यवस्था करावी. त्यांनी तशी व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला आहे. शहानिशा केल्याशिवाय स्त्री आरोपामुळे ''कोणालाही ताबडतोब अटक करू नका.'' असा सुप्रिम कोर्टाचा आदेश आहे अशी अटक करणे हे मानवतेच्या विरुद्ध आहे. स्त्रियांच्या बाजूने एककल्ली विचाराने केलेल्या कायद्याची ती हार आहे काय?

वैवाहिक स्त्री-पुरुषांच्या समस्थानी कोर्ट पण हैराण झालंय स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे हा विचारच न पटणारा आहे. कधी काळी तो असेल वा नसेलही पण आजच्या काळात तरी तो अप्रत्यक्षपणे कृतीत आणला जातोय. 'तू बायकोपण हो आणि कमाईपण कर' हे सगळं समानतेच्या बुरख्याखाली केलं जातंय. बायकांनी ''करियर केलं पाहिजे,'' काहीतरी ॲक्टीव्हीटी केली पाहिजे, ''शिक्षणाचा उपयोग केला पाहिजे'' अशा फसव्या वाक्यांनी स्त्रियांची पिळवणूक राजरोस चालू आहे. विवाहोत्सुक मुलांची अटच असते. बायको नोकरी करणारीच हवी. ही पद्धत हुंड्यापेक्षा जाचक आहे. पूर्वी एकदा हुंडा घेतला जायचा. आजचा मुलगा दर महिन्याला हुंडा घेतोय, हुंड्यापेक्षा लाजिरवाणी आणि क्लेशकारक ही पद्धत 'सवाई हुंडा' पद्धत म्हणता येईल. गाई-म्हशींना जास्त दूध देण्यासाठी ऑक्सिटॉसिन इंजेक्शन देण्याचे गैरप्रकार पकडले गेले. वरील वाक्ये म्हणजे स्त्रियांकरीता जणू ऑक्सिटॉसिनच आहेत. त्याचे दुष्परिणाम म्हणजे मुले बिघडणे, वाममार्गाला लागणे, फसविली जाणे, मानसिक कमजोर होणे, वेडिपिशी होणे, शारीरिक कमजोरी, आत्महत्या करणे इ. होय. अशा प्रकारचे मुले बिघडण्याचे परिणाम नुसत्या कुटुंबापुरते मर्यादित न राहता त्याचा परिणाम भोवतालच्या समाजावर होत

असतो. एवढेच नव्हे तर समाजासाठी तो त्रास भोगावा लागतो. आपल्या भारतीय संस्कृतीने मातृपदाचे महत्त्व ओळखून स्त्रीचा ''मातृदेवो भव'' हा बहुमान केला आहे. मुलगी, बहीणच नव्हे तर बायकोपेक्षा माता श्रेष्ठ म्हटलेले आहे. कारण तीच मुलं सुसंस्कारीत करून समाज सुसंस्कारीत करत असते. जिजाबाईच आदर्श असायला हवी नाहीतर समाजाचे अध:पतन अटळ आहे.

पुरुष अत्याचारी म्हणावं तर स्त्रियाही काही कमी नाहीत. कुठे पुरुष गैर वागत असतो तर कुठे स्त्री. आताच्या जमान्यात फक्त पुरुष-स्त्री संबंधित अनाचारी वागतो असे म्हणणे म्हणजे भोळेभाबडेपणाचे तसेच संकुचित दृष्टीचे ठरेल. बेगडी समानतेच्या कल्पनेने समाजाची स्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. घटस्फोटाचे प्रमाण वाढीला लागले आहे. भांडणे असावीत ती समानतेकरीता नसून न्याय मिळविण्याकरीता असावीत. आपल्यावर अन्याय होतो आहे हे समजण्याची बुद्धी येऊन विघटन न होता प्रतिकार करण्याची क्षमता येणं हाच सुखाकडे जाण्याचा मार्ग आहे.

असे सगळे समाजाचे विदारक व अधोगतीकडे जाणारे चित्र पाहता समाजसुधारण्याच्या कामात शिरोभागी असणाऱ्या समाजानी योग्य तो बोध घेऊन समाजात निर्माण झालेले स्त्री-पुरुष समानतेचे विकल्प करावेत. इतर सहजच त्याचे अनुकरण करू लागतील.

❖

# बंदी भाऊ परब

• श्री. अच्युत म. चक्रदेव, (पृ.७५३), पुणे  भ्रमणध्वनी - ९६२३५५०६३३


**सा**धारण १९६८ चा काळ. त्यावेळी मी येरवडा म. कारागृहात नोकरीस होतो. अचानक माझे समोर एक बंदी आला व माझेकडे काही काम द्या म्हणू लागला. मी त्याची पूर्ण चौकशी करू लागलो. त्याने मला सांगितले की, ''त्याचे शिक्षण आठवीपर्यंत झाले आहे. पुढे परिस्थितीमुळे त्याचे शिक्षण होऊ शकले नाही. मी त्याला म्हणालो, ''असे अचानक काम देता येत नाही. त्यासाठी स्वतंत्र समिती नेमली जाते. समितीमध्ये कारागृहाचे अधीक्षक, कारखाना व्यवस्थापक, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, शिक्षक इ. सर्वजण असतात.

सर्वांसमोर बंदीला बोलावले जाते. त्याचा गुन्हा, गुन्हा घडताना असलेली पार्श्वभूमी, बंदीची आवड इ. लक्षात घेवून बंदीला काम दिले जाते. त्यानुसार भाऊ परबला बोलावले गेले. सर्वांनी सर्व विचारांती बंदीला शेती काम दिले. ह्यानुसार तो शेती विभागांत काम करू लागला. पण सहा महिन्याच्या बैठकीत बंदी परब याचेबाबत तक्रार आली. त्यानेही त्याला शेतीकाम जमत नाही असे सांगितले. मग त्याला लोहकाम विभागात काम दिले गेले. तेही त्याचे इच्छेप्रमाणे दिले. तेथेही तो काम करू शकला नाही व मला रत्नागिरी कारागृहांत पाठवा असे म्हणू लाभला. कारण तो मुळचा सावंतवाडीचा असल्यामुळे तेथील काम त्याला जमू शकेल असे त्याला वाटले. परंतु त्याची ही विनंती मान्य होवू शकली नाही. त्यानंतर त्याला लाकूडकाम विभागांत काम दिले गेले.

लाकूडकाम विभागात तो मनापासून रमला. फर्निचर तयार करण्याकडे लक्ष देवू लागला. पण मुख्य म्हणजे तेथेच त्याला लाकडांपासून कृत्रिम फळे तयार करण्याचा उपविभाग आढळला. या विभागाचे निर्देशकही त्याच्याच गावचे, सावंतवाडीचे. कृत्रिम फळे पांगाऱ्याच्या झाडापासून तयार करतात. त्याला कसाही आकार देता येतो. फळे इतकी उत्तम बनविली जातात की, खऱ्या फळांमध्ये कृत्रिम फळे ठेवली तर खरी कोणती व कृत्रिम कोणती हे ओळखू येणार नाही. एका तबकांत अशी फळे ठेवून ती कारागृहात निर्मित वस्तूंच्या विक्री केंद्रात ठेवून ती तबके विकली जावू लागली.

पांडू परबला सक्तमजुरीची तीन वर्षांची शिक्षा झाली होती. ह्या फळे तयार करण्याचे कामांत कौशल्य दाखवले म्हणून त्याला विशेष माफी मिळून तो लवकर सुटला.

❖



## हसरे हितगुज



### काय करणार ?

बापू, मित्राकडे गेला. दारातूनच त्यानं विचारलं, ''वहिनी सदू कुठाय?''

''त्यांचा पाय मोडलाय. दवाखान्यात आहेत.'' सदूच्या बायकोनं सांगितलं.

''आँ! काय झालं?'' बापू

''अहो, परवा शेवग्याच्या शेंगा काढा म्हटलं. आमटीला झाल्या असत्या. पण ते झाडावर चढले आणि फांदी मोडली. ते सरळ खाली दणकले.''

''मग?''

''मग काय! मी उसळच केली त्या दिवशी.'' वहिनींनी खुलासा केला.

# सहस्रचंद्रदर्शन

• नंदकुमार मराठे, (पृ.२१९), कोल्हापूर दूरध्वनी - ०२३१-२५४१८२३

भारतीय संस्कृती आणि तिची परंपरा याला अन्योन्यसाधारण महत्त्व आहे. हजारो वर्षांची ही प्राचीन परंपरा आजही तितक्याच जोमाने सांभाळणारी अनेक कुटुंब संस्था आपल्याला आढळून येतील. अर्थात भारतीय हे सर्वसाधारण उत्सवप्रिय आहेत, असे म्हटले जाते. या उत्सवात 'वाढदिवस' हा एका वेगळ्या लौकिक अर्थाने संपन्न होणारा उत्सव आहे.

आयुष्य म्हणजे इहलोकात राहण्याची कालमर्यादा याला जीवन मर्यादा म्हणूनही संबोधतात. या जीवनाची सुरुवात आणि सांगता पुनर्जन्मातील सुकृत व दुष्कृत कर्मानुसार विधात्याने गर्भावस्थेत असतानाच नियमित केली आहे. आयुष्य, कर्म, वित्त, अन्न, मरण या पाच गोष्टी गर्भावस्थेत कोठे, कशा व केव्हा या ठरल्या आहेत. त्याला ललाटरेषा किंवा दैव म्हटले आहे. जाणकारांनी मनुष्य प्राण्याची आयुर्मर्यादा १०८ वर्ष ते १२० वर्ष ठरवून दशापद्धती दिलेली आहे. बृहजातककार वराह मिहीराचार्य वेदवचनांनी प्रत्येक युगातील वयोमर्यादा भिन्न-भिन्न सांगितली आहे. कलियुगात ही मर्यादा उत्तरोत्तर कमी-कमी होईल, असे भागवताच्या द्वादशस्कंधात दर्शविले आहे. त्यामुळे आयुष्य हे अमूल्य आहे. शास्त्रकार सांगतात, 'न लभ्यते कोटिभि: कदापि' - कोट्यावधी मुद्रा खर्चून एक क्षणही कोठे मिळणार नाही.

आयुष्यात बालपण, तारुण्य व वार्धक्य अशा वेगवेगळ्या वयातील अवस्था दाखविल्या आहेत. यावेळी तृतीय अवस्थेत शरीराच्या ठिकठिकाणी अनेक आघात, आजार, इंद्रिय, वैपुण्य होण्याचा संभव असतो, तो टाळावा. उर्वरित आयुष्य सुखाने जावे म्हणून वयाच्या पन्नाशीपासून दर पाच वर्षांनी तर काही ऋषीमुनींनी साठीनंतर दर दहा वर्षांनी 'शांती' सांगितली आहे. त्यांना ''वयो:वरश्याशांती'' असे शौनक ऋषींनी सांगितले आहे.

वयाच्या ५० व्या वर्षी ''वैष्णवी'', ५५ व्या वर्षी ''वारूणी'', ६० व्या वर्षी 'ऊग्ररथशांती' यालाच 'साठीशांती' असेही संबोधतात. वयाच्या ६५ व्या वर्षी 'मृत्युंजय महारथी', ७० व्या वर्षी ''भैमरथी'', ७५ व्या वर्षी 'ऐंद्री', ८० व्या वर्षी ''चांद्री'', ९५ व्या वर्षी ''त्र्यंबक महारथी'', १०० व्या वर्षी ''महामृत्युंजय शांती'' अशा वेगवेगळ्या कालावधीसाठी धार्मिकशांती कर्म सांगितले आहे.

वयाच्या ५० व्या वर्षापासून १०० व्या वर्षाच्या या ५० वर्षाच्या कालावधीत दर पाच वर्षांनी ११ वेळा 'शांती'. भट्टभास्करांनी व शौनकादी ऋषी मुनींनी सांगितल्या आहेत. उग्ररथशांती हा साठी शांतीचा प्रयोग ऋग्वेदी ब्रह्मकर्मात आहे. परंतु ५० व्या वर्षीची वैष्णवीशांतीचा प्रयोग सहसा उपलब्ध होत नाही.

वयाच्या ८० व्या वर्षी सहस्रचंद्र दर्शन होतात तर काहींच्या मते होत नाहीत. याबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. काही वेळा परिस्थिती अनुरूप विहीत वेळेत या शांती करणे शक्य नसल्यास ५० ची ५१ व्या वर्षी, ६० व्या वर्षाची ६१ व्या वर्षी, ८० ची ८१ अथवा ८२ व्या वर्षी शांती करणेसाठी शास्त्र संमत आहे.

सहस्रचंद्र दर्शन म्हणजे मानवी आयुष्यात ८० वर्षात १ हजार वेळा चंद्रदर्शन होते. काहींचे आयुष्यात ८० वर्ष ८ महिन्याच्या कालावधीत १००० वेळा चंद्रदर्शन पूर्ण होते. प्रतिमहिन्याच्या शुक्लपक्षातील द्वितीयेला चंद्रोदय होतो. अमावस्येला त्याचा अस्त होतो. असा एक चंद्र म्हणजे १ चंद्रदर्शन जन्मापासून असे १००० वेळा चंद्रदर्शन व्हायला हवे. त्याचवेळी सहस्रचंद्र दर्शन शांती प्रयोग करावा. ८० वर्षात दर महिन्याचे एक म्हणजे ८०×१२=९६० चंद्रदर्शन. अधिकमास ३२ महिने १६ दिवस ४ घटिका एवढ्या कालावधीने येतो. या ८० वर्षाच्या कालावधीत ३२ वेळा चंद्रदर्शन हे अधिक मासांचे आहे. तर ८० वर्षाच्या पुढील ८ महिन्यात ८ वेळा चंद्रदर्शन गृहित धरले आहे. त्यामुळे ९६०+३२+८=१००० चंद्रदर्शन असे गणित शास्त्रकारांनी निर्देशित केले आहेत आणि त्यामुळे ८० वर्ष ८ महिन्याचा वयाचा कालावधी झाल्यानंतर ८० वर्ष ९ व्या महिन्यात ही 'सहस्रचंद्र शांती' करण्याची प्रथा सरासरी रूढ आहे.

या सर्व शांती प्रयोगात साधर्म्य आढळते. तथापि, वेगवेगळ्या शांती प्रयोगात शांती देवता, मंत्र, हवनीय द्रव्ये, हवन संस्था, उपदेवता, नक्षत्र देवता यामध्ये औपचारिक बदल आढळतात. या प्रयोगात यजमान सपत्नीक सहभागी होतात. गणपती पूजन, पुण्याहवाचन, गुरुजींना अनुज्ञा करून गुरुजींच्या हस्ते शांतीकर्म एक अथवा अनेक पुरोहिताद्वारे प्रयोग करतात.

प्रथम पंचगव्य, मोहरी आदींनी जागाशुद्धी पुरुषसुक्ताने देहशुद्धी, देवता स्थापना, अग्नीस्थापना, देवतापूजन, आयुष्य

संवर्धनासाठीचे मंत्र, सुक्तपठण, श्रवण, हविद्रव्यातून आहुती, प्रायश्चित होम, क्षेत्रपाल बळी, कुटुंबातील समस्त इष्टांना आसनस्थ करून शांतीसुक्त अभिषेक यजमानाचे हस्ते पुर्णाहुती देऊन उत्तरांगात स्थापित देवता उत्तरपूजा कलशोदकातील अभिमंत्रित जलाने कुटुंबावर जलाभिषेक त्यानंतर नूतन वस्त्र परिधान करून यजमानाला पुन्हा होमकुंडाजवळ आसनस्थ करून अग्नीदेवता प्रार्थना होमविभुती धारण कास्यधातूच्या भांड्यात मुखालोकन करून पीठदान, दशदान, बलिदान व सुहासिनी हस्ते जितक्या वर्षांची शांती तितके दीप ओवाळून यजमानांची आरती सर्वांनी शुभ आशीर्वचन, चिंतन करून विष्णुस्मरणाने या सर्व विधींची सांगता करणेत येते. प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार व परिस्थिती अनुरूप या शांतीप्रयोग करावेत, असे या क्षेत्रातील ज्येष्ठ जाणकार सांगतात.

❖


आरोग्यं धन संपदा

# लॅरींन्जायटीस

• डॉ. सीमा श्याम मराठे, (पू.४११), पुणे  भ्रमणध्वनी – ७५०७९११९०६

**कारण** : सर्वसाधारणपणे सर्दीनंतरचे कॉम्प्लिकेशन असते. सर्दीनंतर टॉन्सिल्स व घशामध्ये बाधा होते व नंतर हे विषाणू व जंतू स्वरयंत्रापर्यंत जातात आणि अ‍ॅटॅक करतात याशिवाय शरीरात इतर व्हायरसपासून होणाऱ्या रोगांनंतरही लॅरिन्जायटीस होवू शकतो. हवेतील प्रदूषण, विषवत वायू, धूर, धूळ हे नाकावाटे डायरेक्ट घशात गेल्यामुळे लॅरिन्जायटीस होतो. गोवर, (Measles) कांजिण्यानंतर, कॉम्प्लिकेशन म्हणून स्वरयंत्र बाधीत होते. अन्नातूनही काही बाधक द्रव्ये खाल्ली गेल्यास स्वरयंत्रावर परिणाम होतो.

**लक्षणे** : ह्या रोगामध्ये स्वरयंत्रावरील भागावर व बाजूच्या भागावर सूज येते. तेथील रक्तप्रवाहात वाढ होवून सूजेवर लाली येते. घशात प्रथम खवखव होवून कोरड पडते. बोलण्यातील आवाज सुरुवातीला घोगरा होतो व नंतर बोलणे अतिशय अस्पष्ट होते. शिवाय बोलतांना घशामध्ये वेदना होतात. त्रासदायक कोरडा खोकला येतो. अधिकत: लहान मुलांमध्ये श्वसननलिकेच्या वरील भागात सूज येवून श्वसनाचा मार्ग लहान होतो. श्वास घेण्यास त्रास होवू लागतो. विचित्र आवाज असलेला खोकला येवू लागतो. मराठी भाषेत यास डांग्याखोकला म्हणतात. ही अवस्था योग्य उपचार वेळेवर न मिळाल्यास गंभीर रूप घेते. श्वसन अतिशय कष्टदायक होवू लागते व रोगी ऑक्सीजन कमी मिळाल्यामुळे मुर्छितही होतात. अशा अवस्थेत ताबडतोब हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट करावे. घरी उपचार होवू शकत नाहीत. हॉस्पिटलमध्ये रुग्णास पूर्ण विश्रांती मिळते. थंड, प्रदूषित हवेपासून संरक्षण दिले जाते. आहार गिळण्यास उपचार केला जातो. तिखट, आंबट, थंड पदार्थ वर्ज्य आहेत. त्याचबरोबर जंतूनाशक लिक्विडने गुळण्या करण्यास




देतात. घशास, स्वरयंत्रास संपूर्ण विश्रांती म्हणून रुग्णास कमी व हळू बोलण्यास सांगावे.

साधारणपणे ५–६ दिवसात ‘लॅरिन्जायटीस’ या दुखण्यापासून बरीच सुधारणा होते. परंतु काळजी म्हणून काही दिवस औषधे दिली जातात.

कॉम्प्लिकेशन्स : पुन्हा पुन्हा लॅरिन्जायटीस झाल्यास तेथील इन्फेक्शन श्वासनलिका, ब्रॉन्काय व फुफ्फुसे यामध्ये पसरते. ब्रॉन्कायटीस, न्युमोनिया होवू शकतो. कायम स्वरूपी ब्रॉन्कीयल अस्थमा (दमा) होण्याची शक्यता आहे. शिवाय बोलण्यातील आवाजात कायमस्वरूपी बदल होवू शकतो. स्वरयंत्रातील कॉर्डस्‌मध्ये बाधा होते.

❖

**सुविचार**

बोलताना शब्दांची उंची वाढवा, आवाजाची नको.
पावसामुळे शेती पिकते, विजेच्या कडकडाटामुळे नव्हे!
– पु.ल. देशपांडे

# जादुई स्वरांची बेगम

• सुधाकर दत्तात्रय उर्फ बाळ मराठे, (पृ २५२), पुणे भ्रमणध्वनी – ९८२२३२९७७०

२०१९ साली कदाचित तिची जन्मशताब्दी साजरी केली जाईल, कारण आयुष्यांची जेमतेम २५ वर्षे हिंदी चित्रपट सृष्टीच्या पार्श्वगायनात सर्वोच्च स्थानावरच असलेली 'शमशाद बेगम' आज अनेकांना आठवणारही नाही.

भलेही आयुष्य ९० च्या पुढेही लाभले, पण १९६०-६५ नंतर निर्माण झालेल्या स्पर्धेच्या युगात ही ढंगदार आवाजाची गायिका मागेच राहिली. पण जुन्या हिंदी चित्रपट संगीताचे मनापासून चाहते आजही आहेत आणि शमशादच्या स्वरांचा आनंद ते अनुभवत असतातच.

एखाद्या गायकाच्या ''खास'' आवाजाची, ढंगाची किंबहुना गाण्याची ही 'खास आपली' अशी भावना किंवा आठवण प्रत्येकाच्या मनात असतेच आणि ती भावनाच परमोच्च आनंद देणारी ठरते. असाच आनंद देणारा आवाज शमशादचा होता. 'ढंगदार, रंगतदार, धारदार आणि मखमलीही!'

१४ एप्रिल १९१९ रोजी पंजाबातील अमृतसरमध्ये जन्मलेल्या शमशादला प्रथमत: अभिनयातच रस होता. परंतु वडिलांच्या विरोधामुळे तिने गायनात रुची घेतली, पण गायनाचे रीतसर शिक्षण तिला कधी मिळालेच नाही. ग्रामोफोनवर सतत गाणी ऐकूनच तिने गायन शिकण्याचा प्रयत्न केला.

''जेनाफोन'' नावाच्या कंपनीने शमशादने गायलेल्या पंजाबी गाण्याची रेकॉर्ड प्रसिद्ध केली, तेव्हा तिचं वय अवघं १४ वर्षाचं होतं. त्यातील गाणं चांगलं गाजताच अनेक खाजगी गाणीही शमशादने रेकॉर्डसाठी गायली.

पुढे 'लाहोर' आणि 'दिल्ली' रेडिओसाठी शमशादने काम केले आणि त्या वेळचा तिचा 'तो' आवाज अनेकांना मोहवून गेला. पुढे प्रख्यात सारंगीवादक हुसेन बक्सवाले यांनी तिच्या आवाजाची योग्य ती दखल घेत तिला संधी दिली.

पारंपरिक मुस्लीम कुटुंबातील असूनही घरच्यांचा विरोध पत्करूनच तिने 'गणपत लाल बट्टो' या हिंदू युवकाशी 'विवाह' केला.

१९४४ मध्ये प्रसिद्ध दिग्दर्शक 'मेहबूब खान' यांनी तिला मुंबईत बोलावून घेतले आणि गाडी आणि बंगल्यासारख्या अनेक सुखसोयी उपलब्ध करून दिल्याच शिवाय 'खजांची' आणि 'खानदान' साठी शमशादला संधीही दिली. त्या वेळचे बडे संगीतकार 'मास्टर गुलाम हैदर' यांनी 'खजांची' चित्रपटाची सर्व गाणी गाऊन घेतली. त्यातील ८ गाणी फक्त शमशादची 'सोलो' गाणी होती. त्यातीलच 'सावन के नजारे हैं' या गाण्याने 'रेकॉर्ड' केले.



याच चित्रपटाची (खजांची) 'सिल्व्हर ज्युबीली' पुण्यातच साजरी झाली. 'ग्लोब' सिनेमागृहात (आजचे भग्नावस्थेतील 'श्रीनाथ' म्हणजेच 'ग्लोब') त्यावेळच्या गायनाच्या स्पर्धेत शमशादचंच गाणं गाऊन जिने पहिला नंबर पटकावला ती गायिका होती जेमतेम १४ वर्षांची 'लता मंगेशकर.'

खजांचीच्या यशानंतर पुढे शमशादला 'पंडीत आत्माराम, बुलो सी. रानी, ए. ए. मुख्तार' सारख्यांनी ही अनेक गाणी दिली आणि त्या वेळच्या शमशादच्या आवाजाचा वेगळा ढंग गाजू लागला. कारण 'खणखणीत आणि तरीही गोडवा कायम असणारा शमशादचा 'स्वर'!

नौशाद, सी. रामचंद्र आणि ओ.पी.या सुवर्णकाळातील संगीतकारांना सुरुवातीला शमशादनेच आधार दिला. अर्थातच पुढे शमशादच्या कारकीर्दीत या संगीतकाराचा तितकाच मोलाचा वाटा होता.

नौशादने 'मदर इंडिया'साठी ४ गाणी शमशादला दिली; त्यातीलच 'होली आयी रे' आणि 'गाडीवाले गाडी धीरे हाकरे' आजही आठवली जातात. याच गाण्यांनी आणि सी. रामचंद्रचे वेस्टर्न ढंगातील 'आना मेरी जान संडे के संडे गाण्याने शमशादला भरपूर प्रसिद्धी मिळवून दिली आणि सर्वांत जास्त 'मानधन' घेणारी गायिका म्हणून शमशाद ओळखली जाऊ लागली.

सचिन बर्मन दादांनीही सुरुवातीला तिच्या आवाजाचा खूप छान उपयोग करून बाजार, मशाल, बाजी, शहेनशहा इ. चित्रपट केले. 'बहार'मधील 'सैया दिलमे आना रे... छम् छमा छम् आजही गुणगुणले जातेच.

१९५४ मध्ये ओ.पी.नी शमशादला पहिली संधी दिली आणि तिच्या आवाजाचे वर्णन 'Temple Song' असे केले

होते. पुढे सी.आय.डी. किस्मत, हावडा ब्रीज, नया दौर, अशा अनेक चित्रपटात शमशाद आणि ओ.पी.एकत्र आले. 'लेके पहला पहला प्यार, कही पे निगाहे, बुझ मेरा क्या नाम रे (सीआयडी), रेशमी सलवार (नया दौर), कजरा मुहब्बतवाला (किस्मत) इ. गाणी अजूनही लोकप्रिय तर आहेतच, पण अनेक जाहिराती आणि 'रिमिक्स' साठीही यांचा उपयोग केला जातो.

किशोर बरोबरचे 'मेरी निंदोमे तुम' हे 'नया अंदाज' मधील गाणे अनेकांच्या आवडत्या गाण्यात स्थान मिळवून आहे. 'किशोर मोठा गायक होणार' हे शमशादने केलेले भाकीत कालांतराने खरे ठरलेच.

खरं तर 'गुरुदत्त' हा शमशादचा चाहता होता, ''कही आर, कही पार लागा...'' हे गाणे केवळ गुरुदत्तमुळेच तिला मिळाले, जे अफाट गाजले आणि 'आरपार' चित्रपटही.

पण पुढे गुरुदत्तच्या आयुष्यात पत्नी म्हणून 'गीता दत्त' आली आणि शमशादची संधी कमी कमी होत गेली.

१९४५ ते १९५५ च्या दरम्यान शमशाद 'गायिका' म्हणून अत्युच्च शिखरावर होती. परंतु पतीच्या निधनानंतर शमशादने पार्श्वगायन थांबवले. अर्थातच त्यापूर्वी तिने गायलेली जुनी गाणी लोकप्रिय होत होतीच.

''लता-आशा'' यांचा उदय झाल्यानंतर मात्र अनेक संगीतकारांनी शमशादकडे पाठ फिरविली. तिचं 'मानधन' परवडत नाही म्हणूनही असेल कदाचित, पण लताकडूनही बेगमच्या ढंगातच गाणी गाऊन घेतली जात असत. आयेगा आनेवाला - महल सारखी गाणी लताजींनी ही शमशादच्याच ढंगात गायली.

शमशादच्या कोरसमध्येच प्रथम लताचा आवाज वापरला गेला होता. पुढे दोघींनीही अनेक गाणी गायली. बचपन के दिन भुला ना देना (दीदार), तेरी मेहफील में किस्मत (मुगल-ए-आझम) बहुधा दोघींनीही शेवटची एकत्र गायलेली १९६० मधील कव्वाली.

पुढे शमशादजींनी स्वतःच निवृत्ती जाहीर केली (१९६५) तरीही नंतरची काही गाणी (''कजरा मुहब्बतवाला-किस्मत १९६८) आणि 'नथनीयाँ हाले तो बड़ा मजा आये'' (जोहर मेहमूद इन हाँगकाँग-१९७१) ही गाणी लोकप्रिय झालीच.

शमशादने पंजाबी, बंगाली, गुजराथी, तमीळ बरोबर 'मराठी'तही गाणं गायलं आहे. बाबूजी म्हणजे सुधीर फडके यांनी १९५२ मध्ये आलेल्या 'नरवीर तानाजी'साठी तिला आशा भोसले, अमर शेख, वसंतराव देशपांडे यांच्या समवेत संधी दिली होती. एकंदर सुमारे ६००० च्या वर गाणी असलेल्या या गायिकेने जवळजवळ १३०० गाणी हिंदी चित्रपटांसाठी गायली आहेत.

शमशादच्या इतर गायक-गायिकांबरोबरच्या कव्वालीही गाजल्या. 'तेरी महफील में किस्मत अजमाकर हम भी देखेंगे' ही 'मुगल-ए-आझम'मधील सदाबहार कव्वाली तसेच जाते जाते एक नजर भी देख-ले (कव्वाली की रात), कहते है जिसकी इश्क (आज और कल), चली चली कैसी हवा (ब्लफ मास्टर-उषा मंगेशकर बरोबर) कव्वाली प्रेमींकडून आवर्जून ऐकल्या जातात.

आपल्या गोड गळ्याने शमशादने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला होता. हिंदी चित्रपट सृष्टीतील पार्श्वगायन कला तिने एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवली होती.

शमशादने १९८० साली काही मासिकांना मुलाखती दिल्या होत्या. सन २०१२ साली 'फिल्म फेअर' अंकासाठी मुलाखत देताना आपली खंत व्यक्त केली होती - ''मी जेवढी लोकप्रिय होत गेले, तेवढेच मला कामही कमीच मिळत गेले, नवीन संगीतकारांना उत्तेजन देताना मलाच सगळी गाणी मिळावीत अशी 'अट'ही मी त्यांना कधीच घातली नाही.'' कारण काहीही असले तरी शमशादजींची गाणी कमीच होत गेली हे खरेच होते.

शमशादची मुलगी 'उषा रात्रा' हिनेही स्पष्टच केले की, 'केवळ राजकारणामुळेच आईने मला गायिका न होण्याचा सल्ला दिला असावा. 'मात्र' 'स्वतःच्या आनंदासाठी जरूर गात रहा' असेही सांगितले होते.

ओ.पी.च्याच नावाने असलेले ''ओ.पी.नय्यर'' ॲवॉर्ड तिला मिळाले होते. शिवाय भारत सरकारने २००९ साली ''पद्मभूषण'' देऊन तिला गौरवले होते.

शमशादजींना स्वतःला ''छोड बाबुला का घर'' हे 'बाबुल'मधील गाणं अतिशय आवडायचे आणि ''आज जाना पडा'' हे त्याच गाण्यातील बोल २३ एप्रिल २०१३ रोजी खरे ठरले. ठसकेबाज, ढंगदार आणि रंगतदार आवाजाची ही बेगम आपल्याला सोडून अनंतात विलीन झाली.

**शमशादजींची इतर काही गाजलेली गाणी :-**


१) मेरे पिया गये रंगून वहासे किया है टेलीफून
(पतंगा - सी. रामचंद्र)
२) कैसा जादू किया - नगमा
३) दुखभरे दिन बीते रे भैया (मदर इंडिया-नौशाद)
४) मिलते ही आँखे दिल हुआ (बाबुल-तलत मेहमूद बरोबर)
५) बचपन के दिल भूला न देना (दीदार)
६) एक दो तीन आजा मौसम है रंगीन (आवारा - शंकर जयकिशन)
७) दूर कोई गाये धून ये सुनाए (बैजू बावरा - नौशाद)
८) धरती को आकाश पुकारे (मेला - मुकेशबरोबर - नौशाद)

❖

# दोन दत्तावतार : श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती

• डॉ. सौ. सुमेधा प्र.मराठे, (पृ. १२०), वडाळा दूरध्वनी – ०२२–२४१५०८८९

**म**हाराष्ट्रातील एक प्रमुख उपासना म्हणून दत्तोपासनेकडे आपणास गौरवाने बोट दाखविता येते. महाराष्ट्रातील अनेक पंथोपपंथांनी श्री दत्तात्रेयाला सद्गुरु, श्रेष्ठ गुरु मानून त्याची उपासना चालू ठेविली आहे. महाराष्ट्रात पंढरीच्या पांडुरंगानंतर सर्व थरातून पूजिला जाणारा दुसरा भगवंत श्रीदत्तात्रेयच होय! दत्तोपासना ही प्राचीन असून ती वेद–पुराणापासून चालत आलेली दिसून येते.



तेराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दत्तोपासनेचा जो पुरातन प्रवाह वाहत आला, त्याला अप्रत्यक्षपणे सांप्रदायिक वळण श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्रीनृसिंह सरस्वती या दोन दत्तावतारांनी प्राप्त करून दिले. नृसिंह सरस्वतींचा काळ शके १३०० ते १३८० (इ. स. १३०८ ते १४५८) असा मानला जातो.

### राजकीय परिस्थिती

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनात हा काळ संघर्षाचा समजला जातो. इ. स. १२९४ ला अलाउद्दिनाने दक्षिणेवर स्वारी केली. पुढे इ. स. १३१८ ला यादवांचे राज्य नष्ट झाले. या खिलजी घराण्यानंतर दिल्लीचे तख्त तुघलक घराण्याने घेतले. यातील पहिला पुरुष ग्यासुद्दीन त्याचा मुलगा महंमद तुघलक याने इ. स. १३२५ ते १३४७ पर्यंत आपली लहरी राजवट केली. इ. स. १३४७ मध्ये त्याचा सुभेदार हसनगंगू बहामनी याने स्वातंत्र्य पुकारले आणि राजधानी गुलबर्ग्यास नेली. याच्या राजवटीत दक्षिणेत मुसलमानी सत्ता स्थिर झाली.

मुसलमानी राजवटीत हिंदू प्रजा कत्तल, सक्तीचे धर्मांतरण, देवालयांचा व मूर्तींचा विध्वंस या पाशवी अत्याचारांनी संत्रस्त झाली होती. याचप्रमाणे मुसलमानी आक्रमकांबरोबर आलेले सूफी साधूंचे आक्रमण अधिक परिणामी बनले होते. अनेक हिंदू पीराला भजू लागले होते. दावल मालिकाला नवस करू लागले होते. इतकेच नव्हे तर हिंदूंचे पीरही निर्माण होऊ लागले होते. लोकांच्या खाजगी व्यवहारांत व घरांतल्या बोलण्यांतदेखील मुसलमानी शब्दांचा शिरकाव जास्त जास्त होवू लागला होता. त्यामुळे वाक्यांत पारशी शब्द शिरले. वरच्या दर्जाचे लोक मुसलमानी भाषेचा अभ्यास जारीने करू लागले. अवलिया – पीरांच्या भक्तीने प्रत्यक्ष धर्मांतरण न करता धर्मांतराचे परिणाम हिंदूच्या स्वभावात आपोआप शिरत होते. दत्त ही देवता मुसलमान फकिराच्या रूपाने आपल्या भक्तांना दर्शन देत असल्याच्या कथा भक्तिमार्गाच्या आणि वाङ्मयात पुष्कळ असून, एकनाथांना सुद्धा त्याच स्वरूपात दत्ताचे दर्शन घडले होते. पूर्वी ब्राह्मणाच्या रूपाने भूलोकीचा व्यवहार देव करीत असत. आता त्यांनादेखील मुसलमानी राजवटीने मुस्लिम फकिरांचे रूप धारण केल्याखेरीज इहलोकी वावरण्याची चोरी झाली होती व त्या रूपाचा आदर करण्याइतकी हिंदूंची धर्मनिष्ठा, उदारता किंवा शिथिलता पावली होती. ब्राह्मण स्वधर्माभिमान सोडून या अवनतीला आलेले पाहून कोणाही द्रष्ट्या पुरुषाचे अंत:करण विदीर्ण होईल, अशीच ती परिस्थिती होती. अशा संघर्षमय आणि धार्मिकदृष्ट्या अवनतीच्या काळात 'श्रीपाद श्रीवल्लभ' आणि 'श्रीनृसिंह सरस्वती' या दोन महापुरुषांचा अवतार झाला.

### थोर महापुरुषद्वयाचा अवतार काळ

श्रीपाद श्रीवल्लभ हा पहिला अवतार व नृसिंहसरस्वती हा दुसरा अवतार. हे दोन्ही अवतार एका पिढीच्याच अंतराने झाले आहेत, म्हणजे फार तर पहिल्याचा अंत व दुसऱ्याची प्रसिद्धी त्यामध्ये ३०–३५ वर्षांचेच अंतर असावे. श्रीनृसिंह सरस्वती शके १३८० मध्ये 'निजानंदी बैसले' असल्याचा उल्लेख गुरुचरित्राच्या ५१ व्या अध्यायांत पुढीलप्रमाणे येतो –

कन्यागती बृहस्पतीसी । बहुधान्य संवत्सरेसी ।
सूर्य चाले उत्तर – दिगंतेसी । संक्रांती कुंभ परियेसा ।।३६।।
शिशिर ऋतु माघमासी । असितपक्ष प्रतिपदेसी ।
शुक्रवारी पुण्यदिवशी । श्रीगुरु बैसले निजानंदी ।।३७।।

वरील सर्व योग शके १३८० ह्या वर्षी जुळतात. नृसिंहसरस्वतींचे अवतार कार्य शके १३८० च्या माघमासात संपले. त्यापूर्वी ते ५० वर्षे प्रगट होते असे मानल्यास त्यांचा चरित्रकाळ शके १३३० ते १३८० हा ठरतो, त्यावरून त्यांचा पूर्वावतार ''श्रीपाद श्रीवल्लभ हा शके १३००च्या आंतबाहेर प्रकट स्थितीत होता. फिरोजशहाच्या वेळी प्रत्यक्ष श्रीदत्ताचे अवतार श्रीपाद श्रीवल्लभ हे योगिराज महाराष्ट्रोद्धारार्थ प्रगटले होते. फिरोजशहाची कारकीर्द इ. स. १३९७ पासून इ. स. १४२२ पर्यंत होती. शालिवाहनाच्या चौदाव्या शतकात

महाराष्ट्रास किंबहुना सर्व दक्षिण पथास ब्राह्मणी सुलतानांचे धर्मवेड अत्यंत त्रासदायक झाले होते, असल्या विषम काळी लोकांस धीर देण्यास कोणी मार्गदर्शक पाहिजेच असतो. तसा मार्गदर्शक नसेल, तर राष्ट्र उत्तरोत्तर क्षीण व धर्मलंड होऊन कायमचे अवनत होईल; परंतु महाराष्ट्र तसे अवनत झाले नाही. अनेक आक्रमणे, गंडांतरे, आघात-प्रत्याघात होऊनही महाराष्ट्रातील संस्कृतीला, धर्माला तिळमात्र धक्का पोहोचला नाही. बौद्ध धर्माची लाट येऊन गेली, जैनधर्माने आपला प्रभाव गाजविण्याचा प्रयत्न केला. महंमदीयांच्या धर्मवेडाने काही काळ धर्मप्रसाराचे 'महंमदी स्वप्न' पाहिले पण महाराष्ट्र टिकून राहिले, उलट ते अधिकाधिक जोमच धरून होते. हा जोम अखंडित कायम करणाऱ्यांत शालिवाहनाच्या चौदाव्या शतकांत ह्या श्रीपाद श्रीवल्लभ व श्रीनृसिंह सरस्वती या अवतारी महापुरुषाचीच मुख्यत्वे गणना आहे.

श्रीगुरुचरित्राचा लेखक श्री सरस्वती गंगाधर याने आपली पितृपरंपरा पुढीलप्रमाणे दिली आहे, त्यावरूनही श्रीगुरुंचा काळ चौदावे शतक ठरतो -

आपस्तंभ शाखेसी । गोत्र कौंडिण्य महाऋषि ।<br>
साखरे नाम ख्यातीसी । सायंदेवापासाव ।।४१।।<br>
त्यापासून जगन्नाथ । देवराव तयाचा सुत ।<br>
सदा श्रीसद्गुरुचरण ध्यात । गंगाधर जनक माझा ।।४२।।

*- गुरुचरित्र अध्याय १*

वरील ओव्यांवरून ज्या सायंदेवास श्रीनृसिंहसरस्वतींनी पोटशूलांतून बरे करून यवनेशाच्या भयापासून मुक्त केले, त्यापासून सरस्वती गंगाधर हा ५ वा पुरुष होय. म्हणजे सरस्वती गंगाधरांचा काळ नृसिंहसरस्वतींच्या पुढे निदान शंभर - सव्वाशे वर्षे तरी असलाच पाहिजे. म्हणजे नृसिंहसरस्वतींचा काळ शकशतक चौदाव्याच्या तृतीय पादांत आणि श्रीपाद श्रीवल्लभांचा प्रथम पादांत पडला पाहिजे. हे 'महाराष्ट्रमहोदयकार' श्री. ना. कृ. गद्रे यांचे म्हणणे आपणास पटू शकते.

## श्रीदत्तात्रेयाचा पहिला अवतार श्रीपाद श्रीवल्लभ

श्रीपाद श्रीवल्लभांचा काळ शके १३०० च्या सुमारास येतो. इ. स. सहाव्या शतकापासून राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रसिद्ध असलेल्या मद्रास प्रांतातील पीठापूर गावी श्रीपादांचा जन्म झाला. गुरुचरित्रात या 'पीठापूर पूर्वदेशी' (अ. ५-१०) आणि 'पीठापुरी दत्तात्रेय देव । वास असे सनातन ।। असे पीठापूर या स्थानाचे उल्लेख आहेत.

श्रीपादांच्या वडिलांचे नाव आपळराज आणि मातेचे सुमता. आपळराज हा आपस्तंबशाखीय ब्राह्मण होता. त्याची पत्नी पतीसेवा करणारी, अतिथींचे स्वागत करणारी होती. या ब्राह्मणाच्या घरी अमावस्येच्या दिवशी श्राद्धविधि असताना, ब्राह्मण भोजनापूर्वी दारी एक अवधूत आला असता सुमतेने, त्याला भिक्षा घातली. अवधूताने प्रसन्न होऊन वर मागितला, सुमतेने साष्टांग नमस्कार करून म्हटले -

व्हावा पुत्र आम्हा ऐसा । ज्ञानवंत परमपुरुषा ।<br>
जगद्वंद्य देवसदृशा। तुम्हांसारिखा मज आता ।।

*गु. च. अ.५ ओवी २८*

तिची ही प्रार्थना अवधूताने मान्य केली. 'तापसी पंथाचा उद्धार करणारा कलियुगांत ख्यातिवंत होणारा, दैन्यहारक आणि ज्ञानमार्गे अतुर्वाळी' असा पुत्र तुला होईल. असा अवधूताने तिला आशीर्वाद दिला आणि तो अदृश्य झाला. हा अवधूत म्हणजे दुसरा कोणी नसून साक्षात श्रीदत्तात्रेय होते असे गुरुचरित्रावरून समजते.

अवधूताने दिलेल्या आशीर्वादावरून सुमतेच्या पोटी पुत्ररत्न जन्मले आणि दत्तात्रेयाने दिलेला प्रसाद म्हणून याचे नाव 'श्रीपाद' असे ठेवले. पुढे ते सात वर्षांचे झाल्यावर त्याची मुंज झाली, वेदाध्ययन पूर्ण झाले. सोळावे वर्ष लागल्यावर माता-पिता साहजिकच विवाहाचा विचार करू लागले. तेव्हां प्रथमपासूनच विरक्त असलेले श्रीपाद श्रीवल्लभ म्हणाले,

आपण तापसी ब्रह्मचारी । योगश्रियावांचोनि नारी ।<br>
न लागती हा बोल धरा निर्धारी । श्रियावल्लभ नाम माझे।।

*गुरुचरित्र अ. ५ ओवी ५५*

या घटनेनंतर श्रीपाद श्रीवल्लभांनी घर सोडण्याचा निश्चय केला तेव्हा त्याच्या मातापित्यांना फार दुःख झाले, श्रीपाद त्यांचे सांत्वन करू लागल्यावर आई त्यांना कळवळून म्हणाली, "बाळ, आमचा जीव तुझ्यावरच विसंबून होता. म्हातारपणी कुणाचा आधार आम्हाला । हे तुझे दोन लंगडे पांगळे आणि आंधळे भाऊ! त्यांना कुणी पोसावे?

आईचे हे बोलणे ऐकल्यावर श्रीपादांनी आपल्या दोघा अपंग भावांकडे अमृतदृष्टीने पाहिले आणि तत्काळ त्यांची शारीरिक व्यंगे नाहीशी होऊन त्यांना प्रज्ञाही प्राप्त झाली. त्यामुळे मातापित्यांची चिंता दूर झाली.

## कुरवपुरी वास्तव्य

त्यानंतर त्यांनी पीठापूर सोडले. नंतर ते काशी बदरिकाश्रम इत्यादी तीर्थे करीत करीत गोकर्ण महाबळेश्वरी आले. तेथे राहून पुढे श्रीगिरीपर्वतावर काही महिने वास करून शेवटी कृष्णातीरी पंचगंगा व कृष्णा यांच्या संगमानजीक कुरवपूर येथे कायमचे राहिले. श्रीपादश्रीवल्लभ कुरवपूरला असतांना ज्या दोन घटना घडल्या त्यांचा संबंध श्रीपादांच्या उत्तरावताराशी 'श्रीनृसिंह सरस्वतीं'च्या जीवनाशी निगडीत आहे.

**श्रद्धाळू भक्तांचा उद्धार**

कुरवपूर येथे राहणाऱ्या वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाच्या अंबिका नावाच्या पत्नीला पुत्रसंतान सुख नव्हते. पुत्र प्राप्तीसाठी तिने अनेक तीर्थव्रते केली. परिणामी तिला पुत्र होत, परंतु त्यांचा अकाली मृत्यू होई. शेवटी तिचा एक मुलगा वाचला. परंतु तो अगदी मूढ, मंदगती निघाला. तो मूढ जसजसा मोठा होऊ लागला तसतसा समाजात अधिकच निंदास्पद ठरू लागला. त्याच्या अवस्थेकडे पाहून ब्राह्मण हताश झाला आणि मरण पावला. तेव्हा दोघा मायलेकरांनी कृष्णेच्या कुशीत चिरविश्रांती घ्यायचा निश्चय केला. ती दोघं कृष्णा प्रवाहांत प्रवेश करू लागणार, तो त्यांना श्रीपादयती स्नान करताना दिसले. त्या माऊलीने लगबगीने पुत्रासह श्रीपादयतींना वंदन केले आणि आत्महत्येच्या महादोषातून मुक्त होण्यासाठी आशीर्वाद मागितला. श्रीपाद श्रीवल्लभांनी तिला शनिप्रदोषव्रताचा महिमा सांगून ते आचरण्यास सांगितले. अंबिकेच्या दोन इच्छा होत्या. एक तर मूढ पुत्र प्रज्ञासंपन्न व्हावयास हवा आणि दुसरी इच्छा श्रीपाद श्रीवल्लभांसारखा पूज्यमान पुत्र पोटी यावा!

श्रीपाद श्रीवल्लभांनी तुला पुढील जन्मी विश्वविख्यात पुत्र होईल असा वर दिल्यामुळे अंबिका मरणोत्तर वऱ्हाडांत करंजगावी जन्मास आली. 'जन्म झाला पुढें तियेसी। करंजनगर उत्तरदेशी। वाजसेनेय शाखेसी। विप्रकुळीं जन्मली' तिचे नाव अंबाभवानी ठेवण्यात येऊन माधव नामक धर्मनिष्ठ ब्राह्मणाशी तिचे लग्न लागले – त्यांच्या पोटी नृसिंह सरस्वती जन्मास आले.

कुरवपूर येथे श्रीपाद वल्लभस्वामी कृष्ण व पंचगंगा संगमावर स्नान करण्यास जात, तेव्हा तेथे धुणे धूत असलेला एक रजक त्यांना भक्तिभावाने वंदन करीत असे. पुढे पुढे त्याला श्रीपाद गुरुंच्या सेवेचे वेड लागले. तो त्यांच्या मठाची झाड-लोट करी आणि त्यांच्या चरणसेवेत मग्न राही. एकेदिवशी म्लेच्छ राजा राजपरिवारासह गंगाप्रवाहांत नावेतून विहार करीत होता. वस्त्रालंकार व रत्ने, माणके यांनी शोभणाऱ्या सुंदर स्त्रियांसह त्याने जलक्रीडा आरंभिली. कृष्णा – वेण्याच्या दुथडी हत्ती, घोडे, सैन्य पसरले होते. मधुर वाद्यांचा ध्वनी सर्वत्र दुमदुमत होता, तो थाट पाहून रजकाच्या मनात विचार आला. ''धन्य राजयाचे जिणे। ऐसे सौख्य भोगणे। स्त्रिया, वस्त्रे अनेक भूषणे। कैसा भक्त ईश्वराचा।।'' श्रीपादांनी त्याची तामस राज्यभोगाची वांछा ओळखिली! आणि ते म्हणाले,

श्रीपाद म्हणती रजकासी । जन्मादारभ्य कष्टलासी ।
वांछा असे भोगावयासी । राज्यपद तमोवृत्ती ।।२८।।
निववावी इंद्रिये सकळ । नातरी नव्हे मन निर्मळ ।
बाधा करिती पुढें केवळ । जन्मांतरी परियेसी ।।२९।।
तुष्टवावया इंद्रियांसी । तुवां जन्मावें म्लेंछवंशी ।
आवडी जाहली तुझे मानसी । राज्य भोगी जाय त्वरित ।।३०।।
ऐकोनि स्वामीचे वचन । विनवी रजक कर जोडून ।
कृपासागर श्रीगुरुराणा । उपेक्षूं नको म्हणतसे ।।३१।।
अंतरतील तुझे चरण । द्यावें माते पुनर्दर्शन ।
तुझा अनुग्रह असे कारण । ज्ञान द्यावे दातारा ।।३२।।
श्रीगुरु म्हणती तयासी । वैदुरानगरी जन्म होसी ।
भेटी देऊं अंतकाळासी । कारण असे आम्हां येणे ।।३३।।
भेटी होतांचि आम्हांसी । ज्ञान होईल तुझे मानसी ।
न करी चिंता हो भरवसी । आम्हां येणे घडेल ।।३४।।
आणिक कार्याकारणेसी । अवतार होऊ परियेसीं ।
वेषे धरूनि संन्यासी । नाम 'नृसिंहसरस्वती'।।३५।।
ऐसे तया संबोखुनि । निरोप देती जाई म्हणोनि ।
रजक लय लावोनि चरणीं । नमन करीतसे तया वेळीं ।।३६।।
देखोंनि श्रीगुरु कृपामूर्ती । रजकासी जवळ पाचारिती ।
इह भोगिसी किंवा पुढतीं । राज्यभोग सांग मज ।।३७।।
रजक विनवीत श्रीपादासी । झालों आपण अपरवयासी ।
भोग भोगीन बाळाभ्यांसीं । यौवनी गोड राज्यभोग ।।३८।।
ऐकोनि रजकाचे वचन । निरोप देती श्रीपाद आपण ।
त्वरित जाई रे म्हणोन । जन्मांतरी भोगी म्हणती ।।३९।।

*– गुरुचरित्र अध्याय नऊ*

ह्यावर श्रीपादवल्लभांनी 'तथास्तु' म्हणतांच तात्काळ रजकाने देह सोडला. महाराष्ट्र महोदयकारांच्या मते हा रजक बेदरात अहमदशहाच्या पोटी आला असावा. हा पहिला अहमदशहा क्रूर, ब्रह्मद्वेषी, जीवहिंसक होता. तो शके १३५७ (इ. स. १४३५), मध्ये मृत्यू पावल्यावर त्याचा मुलगा अलाउद्दीन दुसरा हा बेदराच्या गादीवर आला. हिंदूच्या धर्मकल्पनांविषयी, देवतांविषयी आदराची भावनात त्याच्या मनात होती. तो परधर्मसहिष्णु, उदार आणि सत्वसंपन्न होता. गुरुचरित्रकारांच्या श्रद्धेनुसार हा यवनराजा म्हणजे श्रीपाद श्रीवल्लभांनी वर दिलेला पूर्वजन्मींचा रजक होय.

श्रीपादवल्लभांनी वरील प्रकारानंतर थोड्याच दिवसांनी आपले अवतारकार्य संपदिले. गुरुचरित्रकार म्हणतात,

अश्विन वद्य द्वादशी । नक्षत्रा मघा, मृगराज राशी ।
श्रीपाद बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेत ।।४८।। ❖

| घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा– २०१७ | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रथम पारितोषिक | दत्तात्रेय मराठे, रत्नागिरी | १००१ |
| २ | द्वितीय पारितोषिक | अजित वामन मराठे, ठाणे | ७५१ |
| ३ | तृतीय पारितोषिक | अनंत मराठे, अंधेरी, मुंबई | ५०१ |

# श्रेष्ठ साहित्यिक व संपादक ह.मो.

• माधव वासुदेव मराठे, (पृ. ३८६), पुणे भ्रमणध्वनी - ९०२२४१७०२१

मराठी साहित्य सृष्टीत आदराने ज्यांचा उल्लेख होतो ते ज्येष्ठ लेखक ह. मो. मराठे यांचे २ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७७व्या वर्षी निधन झाले. २ मार्च १९४० रोजी कोकणातील दोडामार्ग या तालुक्यातील झोळंबे या गावी एका गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. आई व वडील दोघेही आजारी असत, त्यांच्या मोठ्या भावाने त्यांच्या शिक्षणासाठी त्यांना मदत केली. लहान मोठी कामे करून ते शालेय जीवनापासून अर्थार्जन करीत असत. कोल्हापूरच्या महाविद्यालयात त्यांनी सुरुवातीच्या काळात अध्यापक म्हणून काम केले.

पन्नास वर्षाहून अधिक काळ त्यांचे लेखन मराठी वाचकांना भुलवित आहे. कथा, कादंबरी, वैचारिक लेख, व्यंगकथा अशा अनेक प्रकारात त्यांनी लेखन करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी ही त्यांची पहिली कादंबरी १९६९ मध्ये प्रसिद्ध झाली. ती वाचकप्रियही झाली. अनेक विद्यापीठातून त्यांची ही कादंबरी अभ्यासक्रमात देखील आहे. 'काळेशार पाने' ही लघु कादंबरी साहित्यक्षेत्रात खूपच गाजली. त्यावर 'डोह' हा चित्रपटही निघाला. 'न्यूज स्टोरी' ही त्यांची कथा तर गाजलीच पण त्यावर आधारित 'दोन स्पेशल' हे दोन वर्षांपूर्वी रंगभूमीवर आलेले नाटक ही गाजले. पत्रकार, संपादक म्हणूनही त्यांनी आपली छाप पडली. ह. मो. म्हणूनच त्यांच्या अनेक कार्यक्रमात उल्लेख होत असे. औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्याच्या जीवनावर त्यांनी बरेच लेखन केले व ते ही गाजले. 'लावा' हा हिंदी कथासंग्रहाचे प्रकाशन भारतीय ज्ञानपीठातर्फे करण्यात आले. संपादक ह. मो. यांनी समाजातील श्रेष्ठ व्यक्ती, पुढारी इत्यादी यांचे बरोबर एक पूर्ण दिवस राहून त्यांनी त्या व्यक्तीचे जीवनाचे निरीक्षण करून 'एक व्यक्ती एक दिवस' हे नवीन सदर 'घरदार' या मासिकेतून प्रसिद्ध करून एक नवीन प्रकार वृत्त जगताला दिला.

जयप्रकाश नारायण यांच्या १९७५-८० या काळातील आंदोलनाने ते भारावले. सप्तक्रांतीची कल्पना त्या काळात जनतेसमोर मांडली गेली. त्यातील एक क्रांती जाती विसर्जनाची होती. पत्रकार म्हणून या आंदोलनांचा ह. मो. यांनी बारकाईने अभ्यास केला. ते समाजात जाती नसाव्यात या विचारांचा पुरस्कार करीत होते १९८३-८४ या काळात. किर्लोस्कर या मराठीतील दर्जेदार मासिकाचे ह. मो. संपादक होते. मराठे प्रतिष्ठानच्या पुण्यातील एका सभेला त्यांना बोलावण्यात आले होते. या सभेचा विषय होता मराठे कुलवृत्तांताची सुधारीत आवृत्ती काढणे. कुलवृत्तांत ही चित्पावन ब्राह्मणांची खासियत होती आणि अजून ही आहे. आतापर्यंत शंभराहून जास्त चित्पावन ब्राह्मणांचे कुलवृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत. जयप्रकाश यांच्या जातीविरहित भारताच्या स्वप्नात असलेल्या ह. मो. यांनी कुलवृत्तांत या कल्पनेलाच त्या सभेत विरोध केला होता. तेव्हा ते सभेत बोलताना म्हणाले की लोकशाही समाजव्यवस्थेत कुल, जात, या गोष्टींना थारा नाही. सामाजिक न्याय, पुरोगामी विचार यातून ह. मो. म्हणत असत की प्रत्येकाला प्रगतीची संधी जात न पाहता मिळाली पाहिजे.

या नंतरच्या काळात जयप्रकाशांचे पूर्ण होऊ न शकलेले आंदोलन, जयप्रकाशांच्या बरोबर लढणारे अनेक पुढारी जातींना कसे घट्ट धरून बसलेले आहेत, फक्त सभेत जाती विसर्जित कराव्यात असे ते बोलत व निवडणुका आल्या की जात, धर्म याची गणिते कशी मांडली जातात याची नोंद ह.मों.चे मन घेत होते. त्यातच जातींवर आधारीत आरक्षण व्यवस्था राजकारणाच्या फायद्यासाठी सुरू झालेली त्यांनी पाहिली.

जातीभेद नष्ट होण्याऐवजी जातीभेद वाढत चालल्याचे त्यांनी निरीक्षण केले व यात प्रामुख्याने ब्राह्मणांवर नको तितके टीकेचे आसूड ओढल्याचे त्यांनी पहिले. ह. मो. यांचे विचार बदलत गेले. ते मराठे प्रतिष्ठानच्या सभांना जाऊ लागले. ब्राम्हण संस्थानच्या सभेतही आमंत्रण आले तर जाऊ लागले. या सभांत ब्राह्मणांवर होत असलेल्या नाहक टीकेला ते उत्तर देऊ लागले.

पत्रकार व संपादक या नात्याने त्यांचा अनेक लोकांशी जसा धनिष्ठ संबंध आला तसाच समाजातील प्रश्नांची जाणीवही त्यांना झाली व त्या जाणिवेतून त्यांचे वैचारिक लेख लिहिले गेले व ते लेख लोकमान्यही झाले. या समाज निरीक्षणातूनच त्यांनी ब्राह्मण समाजावर हकनाक होणारी विद्वेषी टीका पाहिली, अनुभवली व त्यातूनच त्यांनी २००४ साली किस्रिमच्या दिवाळी अंकात ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार हा प्रदीर्घ लेख लिहिला. या लेखाने साहित्य क्षेत्रात प्रचंड खळबळ झाली. हा लेख वाचणारे सर्व जातींचे वाचक होते. या लेखावर अनेक प्रतिक्रिया त्यांच्याकडे व किस्रिमकडे आल्या, ज्यात समाजातील सर्व जातींचे वाचक होते. या प्रतिक्रियांचे 'ब्राह्मण मानस' या नावाचे

२२५ पानांचे एक पुस्तक ही प्रसिद्ध झाले आहे.

ब्राह्मणांनी समाजासाठी केलेले योगदान, शिक्षणप्रसार, समाजसुधारणा, धर्मसुधारणा, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण या सारख्या अनेक गोष्टींना समाजात श्रेय मिळत नसल्याची खंत त्यांच्या लेखनात प्रगट झाली. जातीजातीत वैमनस्य नसावे, सर्वांनी सामंजस्याने रहावे यासाठी त्यांच्या पुढाकाराने 'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' या विश्वस्थ संस्थेची स्थापना झाली. या मंचाद्वारे ब्राह्मणसमाजावर अवास्तव केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देणाऱ्या २५ पुस्तिकाही प्रसिद्ध झाल्या आहेत. अत्यंत अल्प किमतीत या पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. २०१३ मध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदासाठी त्यांचे नाव सूचित केले होते पण ब्राम्हण समाजाविषयी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेवरून त्यांच्यावर टीका तर झालीच शिवाय त्यांच्यावर जातीभेद निर्माण केला असे सांगून पोलिसात तक्रारही करण्यात आली होती. आपली भूमिका एक स्पष्ट करून ह.मो.नी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली.

त्यांची प्रसिद्ध झालेली व गाजलेली काही पुस्तिकांची नावे अशी आहेत :

अण्णांची टोपी (कथासंग्रह), कलियुग, इतिवृत्त, (कादंबऱ्या), काळेशार पाणी : संहिता आणि समीक्षा (वैचारिक), दिनमान (उपरोधिक लेख), देवाची घंटा न लिहिलेले विषय (वैचारिक), बालकांड (आत्मकथेचा १ला भाग; दुसरा भाग - पोहरा), मधलं पान (लेखसंग्रह), मार्केट (१९८६), मुंबईचे उंदीर (व्यंगकथा), वीज (बाल साहित्य), हद्दपार ह.मो. मराठे यांच्या निवडक कथा (कथासंग्रह), ब्राह्मण चळवळ कशासाठी? ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? (२००४)

मराठी साहित्य क्षेत्रातील एक चतुरस्त्र लेखक व ब्राम्हण समाजाची जातीयभेदा विरुद्ध मते ठामपणे मांडणारा एक श्रेष्ठ लेखक व वक्ता काळाच्या पडद्याआड गेले ही घटना ब्राह्मणसमाजाला दुःखद आहे.

ह.मो. मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना. ❖

# वाचकांचा पत्रव्यवहार

प्रति,

**मा. संपादिका,**

सुमेधा प्र. मराठे,

''हितगुज'' त्रैमासिक, मराठे प्रतिष्ठान,

८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१

**विषय :-** ''हितगुज संबंधी...''

**संदर्भ :-** आपल्या समवेत झालेले दूरध्वनीवरील संभाषण.

महोदया,

''घुसमट'' ही आपली कथा वाचली. नेहमीप्रमाणेच अतिशय उत्तम झाली आहे. कथा वाचून वाचकाच्या मनांतही ही 'घुसमट' काही काळ रेंगाळत राहते. पण काही काळच...

त्यानंतर 'दत्तावतार' पूज्य माणिकप्रभूंची थोडक्यात दिलेली चरित्रगाथा वाचून ही 'घुसमट'मुळे होणारी घुसमट क्षणार्धात नाहीशी होते.

हा तुमच्या लेखनशैलीचाच प्रभाव. दुसरे काय?

तेव्हा आपण असेच लिहीत राहावे. आणखी एका दत्तावताराचे महात्म्य वर्णन करावे हीच उत्कट इच्छा.

धन्यवाद!

आपला,

**अच्युत म. चक्रदेव,** (पृष्ठ ७५३), पुणे

प्रति,

**मा. संपादिका,**

सप्रेम नमस्कार,

मराठे प्रतिष्ठानच्या 'हितगुज' सप्टेंबर २०१७ मध्ये माझा लेख आठवणीने छापल्याबद्दल धन्यवाद. फेब्रुवारीमध्ये हिमकडा कोसळून दहा जवान गाडले गेले. त्यावेळी एक प्रतिक्रिया म्हणून मी हा लेख पाठवला होता. असो.

सौ. माधवी जाईल यांचा नर्मदे हरहर हे प्रवास वर्णन फारच सुंदर पण प्रवास अतिशय अवघड वाटला. तसेच आपली विरहिणी खूपच मुद्देसुद व उद्‌बोधक वाटले.

प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस याचे डोंगरातून भुयारी मार्ग काढण्याच्या कौशल्याबद्दल अभिनंदन करावे तेवढे थोडेच. ते जिवावरच्या आजारांतून सुखरूप घरी परतल्याबद्दल शुभेच्छा. श्री. आनंदरावांचे प्रवास वर्णन बहारदार आहे.

आपल्याकडून हितगुजची अशीच वेगाने वाढ होवो. नवीन २०१८ या पुढील वर्षासाठी व दिवाळी निमित्त सर्व बंधु भगिनीना हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद, कळावे.

आपला नम्र

**चिं. त्र्यं. मराठे,** (पृ. २४८), कळवा-ठाणे

# ॐकाररूपी गणेश

• सौ. माधवी क. जाईल, (पृ. ७५३), पुणे
दूरध्वनी – ०२२ २४२५१३७९

**ज्ञा**नेश्वरांनी ओंकारावर केलेले गणेशरूपी शब्दब्रह्माचे रूपक. सिद्धचरित्रात भवानीमाता शिवदेवांना प्रश्न करते की, मी तुमच्या तोंडून अठरा पुराणे, इतिहास सर्व ऐकले पण माझ्या चित्ताला समाधान वाटत नाही. तेव्हा देवा असे करा की, तो सुखानुभव मला द्या. तेव्हा भगवान प्रसन्न झाले आणि त्यांनी भवानीला उपदेश केला. ते म्हणतात,

''गिरजे या मूळ एकाक्षरे । जीवांचे जीवपणबिसरे ।
अहं ब्रह्मास्मि इया गरजे । गर्जे वेदु अखंड ।

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची सुरुवात आद्यतत्त्व परब्रह्माचा जयजयकार करून त्यांनी याच मंगलाचरणाने केली आहे.

ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।
जय स्वयंवेद्या । आत्मरूपा ।।१।।

माऊलींनी अशा या नाथपंथाच्या बीज मंत्राचा ग्रंथारंभी उच्चार केला आहे. ॐ हा साडेतीन मात्रांचा बनलेला आहे. आकार, उकार, मकार व चंद्रकोर ही अर्ध मात्रा. त्या गणरायाचे आसनस्थ दोन्ही चरण 'अ'कार आहेत. श्रीगणेशाचे विशाल उदर 'उ'कार आहे. आणि श्रीगणेशाचे महामंडल मस्तक 'म' आहे. म्हणजेच ओंकार होय. ॐकारातील अ ही मात्रा म्हणजे स्थूल जगत (जग) सारी जड साकार सृष्टी. 'उ'कार म्हणजे सारे सूक्ष्म जगत, म्हणजे मन, बुद्धि, अहंकार यांचे सूक्ष्म जगत. 'म'कार म्हणजे ज्ञान जगत. मस्तक. अर्धमात्रा म्हणजे नाद बिंदू. ही प्रशांत परब्रह्माची अवस्था आहे. ज्ञानदेव म्हणतात – 'अकार चरण युगुल । उकार उदर विशाल। मकार महामंडळ। मस्तकाकारे ।।

हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळले । ते मिया गुरुकृपा नमिले । आदिबीज ।।


माऊलींनी अशा या पहिल्या ओवीतच सर्व ज्ञानेश्वरी सांगितली आहे असे वाटते. या बीजमंत्राचा उच्चार करून त्यावर गणेश रूपकाचा साज चढविला आहे. 'ॐकाराचा जयजयकार केला आहे. वेदांनी त्याचे प्रतिपादन केले आहे. पण तो जाणवतो आपल्याच ठिकाणी भेटतो. आपल्या स्वत:च्या रूपातच. हे ॐकारा तूच गणेश आहेस. अथर्वशीर्षामधले 'मुलाधार' स्थितोऽसिनित्यं. हे वचन आठवते. ध्वनी मूलाधार चक्रात उत्पन्न होतो, हे ध्यानात आले की, या ओवीचे सुंदर रूप कळते. मूलाधार चक्राची देवता गणेश आहे. छातीचे मूळ मुलाधार चक्रात आहे व सर्व सारस्वत ध्वनीरूप आहे. आता हा ध्वनी गणेश कृपेने व्यक्त होतो. म्हणजेच सर्व प्रकारच्या अर्थाचा प्रकाश बुद्धीमध्ये पडतो तो गणेशामुळेच. अखिल सारस्वत, मग त्याचा कर्ता कोणीही असो. विषय काहीही असो. हेतू कोणताही असो ते केवळ एक आदिबीज ॐकाराचाच विस्तार आहे. आत्मरूप, आद्यतत्त्वाला नमन करणारी ही पहिली ओवी आपल्याला मंगलमय वातावरणात घेऊन जाते. इतके उदात्त, विशुद्ध आणि प्रशांत असे नमन दुसरीकडे कुठे सापडेल असे वाटत नाही. ज्ञानदेवांचा वाङ्मय स्वरूपी षड्भुज गणेश असा आहे. म्हणजे संपूर्ण वेद वाङ्मय, श्रुती हीच त्या गणपतीची उत्तम सजलेली मूर्ती आहे. जिचे निर्दोष म्हणजेच स्वर, व्यंजने इ. वर्णरूपी शरीर म्हणजेच अंगकांती सौंदर्याने शोभत आहे. ती अशी की, मन्वादिकांची स्मृती हेच त्याचे अवयव असून त्या स्मृतीला अर्थ म्हणजे सौंदर्य. जणू लावण्याची खाणच आहे. अठरापुराणे म्हणजे त्याच्या अंगावरील रत्नखचित अलंकार होत. त्यातील सिद्धान्त हिच जणू रत्ने आहेत आणि छंदोबद्ध पद योजना ही सिद्धान्त रत्नांची कोंदण आहेत. उत्तम पदलालित्य हेच त्यांच्या अंगावरील रंगविलेले वस्त्र आहे. शब्दरचनेतील अलंकार हे त्या वस्त्राचे भरपूर लांबरुंद लकलकीत तलम पोत आहे. काव्य व नाटके ही गणेशाच्या करगोट्यातील लहान लहान घागऱ्या आहेत आणि त्यांचा मंजुळ आवाज रुणझुणत आहे. त्यातील तत्त्वाचे अनेक प्रकार मार्मिकतेने पाहिले असता त्यात कुशलता दिसते. त्यातील यथार्थ असलेली वाहक पदे ही जणू अप्रतिम रत्नेच आहेत. व्यासादिकांची बुद्धी ही जणू त्या गणपतीच्या कंबरेत बांधलेली मेखला आहे. ज्या मेखलेच्या शेल्याच्या लोंबत्यादशा म्हणजे बुद्धीचा निर्दोष सरळवृत्ती निर्मळपणाने झळकत आहेत. ज्यास सहा शास्त्रे म्हणजेच वेदप्रामाण्य मानणारी आस्तिक शास्त्रे. ही सहा शास्त्रे म्हणजे गणपतीचे जणू सहा हातच आहेत. त्या शास्त्रातील एकमेकात मेळ नसणारी मते ही त्या सहा हातात

धारण केलेली निरनिराळी सहा शस्त्रे होत. वैशेषिक शास्त्ररूपी हातामध्ये तर्कशास्त्र (न्यायदर्शन) हा जणूं 'परशु' आहे. दुसऱ्या हातात तत्त्वभेद (नीतीशास्त्र) हा जणूं अंकुश आहे आणि भगवान व्यासांचे वेदांत 'सूत्ररूपी हातामध्ये ब्रह्मानंदात्मक महारसाने भरलेला ब्रह्मात्मैक्य ज्ञानरूपी मोदक शोभत आहे. पतंजलीचे योग शास्त्ररूपी एका हातात दात धारण केला आहे. तो मुळातच मोडका आहे. तो दात म्हणजे वार्तिककारांच्या व्याख्यानात बौद्धाचे शून्यमत स्वभावत: खंडित असल्याचा संकेत आहे. कारण पतंजलीत ईशतत्त्व अधिक मानीत असल्यामुळे ते 'सेश्वरसांख्यं' होत. या त्यांच्या एका वैशिष्ट्यावर बौद्धांचा शून्यवाद स्वभावता खंडीत असल्याचे सूचित करण्यासाठी खंडीत दात धारण केला आहे. कपिलांच्या सांख्य शास्त्रातील सत्कार वाद हा जणू वर देणारा कमळासारखा हात होय. धर्माची स्थापना व सिद्धी करणारा जैमिनीकृत धर्मसूत्रातील वेदवाक्यार्थ विचारपूर्वक सिद्ध केलेला धर्मनिर्णय हा जणू अभय देणारा हात होय. केवळ दु:खसंबंधरहित, उपाधीरहित सच्चितसुखाचा अतिसरळ व अतिनिर्मळ हीच त्या गणपतीची लांब सोंड होय! तत्त्वनिर्णयास उपकारक असा उत्तमवाद हाच एक दात असून व नि:पक्षपातीपणा त्या त्याचा पांढरा रंग होय. निरीक्षण क्षम असे बारीक नेत्र आहेत. कान म्हणजे पूर्वमिमांसा व उत्तरमिमांसा होत. ज्ञानामृत गंडस्थळातून निघणारा मकरंद आहे व मुनीरूप भ्रमर त्याचे सेवन करतात. उपर्युक्त श्रुतिस्मृतींतील सिद्धांताना ही अंगावरील सतेज पोवळी होत होती. द्वैत व अद्वैत ही त्याची दोन गंडस्थळे होत. ईश, केन, कंठ, प्रश्न मुंडक, मांडुक्य, ऐतरेय, तौलिरीया, छांदोग्य व ब्रह्मदारुण्य ही दश उपनिषदे सुगंधीप्रमाणे त्याच्या मस्तकावर शोभत आहेत. ज्या फुलामधून ज्ञानमकरंद भरभरून वाहत असतो.

❖

---

# विख्यात नृत्यांगना डॉ. मंजिरी श्रीराम देव (मराठे माहेरवाशिण)



'कलानगरी कोल्हापूर' ते 'सांस्कृतिक वसा घेतलेले ठाणे' अशा दोन विभिन्न तरीही कलेच्या एकाच धाग्यात गुंफलेल्या दोन्ही शहरांच्या मातीशी नाळ जोडली गेली आणि तोडे, तुकडे, तिहाई या संकल्पना कायमच्या सोबती झाल्या. नृत्याचे धडे जरी बालपणापासून घेतले असले तरी काळाची गरज ओळखून लग्नानंतर नव्याने दिलेल्या नृत्याच्या परीक्षा, त्यासाठी मुंबईत केलेला गुरुशोध, कलेची ही परंपरा विद्यार्थ्यांना देण्यासाठी उभारलेली संस्था आणि रसिकांपर्यंत शास्त्रीय नृत्य पोहोचविण्यासाठी विविध संकल्पनांचे महोत्सव अशा विविध उपक्रमांची धुरा पेलणाऱ्या नृत्यालंकार देव यांना थकणे माहीतच नाही. विद्यार्थी, गुरू आणि हरहुन्नरी कलाकार अशा त्यांच्या त्रिविध भूमिकेला विठ्ठल उमप फाऊंडेशनतर्फे मृद्‌गंध पुरस्कार मिळणे, हा त्यांचा उचित सन्मान आहे. कोल्हापूरसारख्या कलानगरीत जन्म झाल्याने कलेशी घट्ट नाते होतेच. पूर्वाश्रमीच्या मृणालिनी मराठे यांना आईने नवव्या वर्षी आग्रहाने पंडित बद्रीनाथ कुलकर्णी यांच्या क्लासमध्ये पाठवले आणि घुंगरांशी ओळख झाली. नृत्याने धडे सुरू असले तरीही कथकची परीक्षा देण्याची संधी मिळाली नव्हती. शिक्षण होताच श्रीराम देव यांच्याशी विवाह ठरला आणि मंजिरी देव या नव्या नावासह गावही बदलले. कोल्हापूर ते ठाणे हा प्रवासात नृत्य काहीसे मागे पडले. संसार, मुलांचे जन्म या जबाबदाऱ्या पार पाडताना आठ वर्षांत एकदाही कथकचा रियाज झाला नाही. तरी मन तिकडे ओढ घेत होते. नृत्याशी पुन्हा नाते जोडण्यासाठी पाच मुलींसह पहिला क्लास सुरू केला. त्यासह कथकच्या पुढच्या परीक्षा देण्यासाठी कोल्हापुर-ठाणे हा प्रवास सुरू झाला. मग गुरूंच्याच इच्छेने मुंबईत नव्या गुरूंचा शोध. गुरू आशा जोगळेकर यांची भेट घडली आणि नृत्यप्रवास समृद्ध बनला. मग मुलगा मुकुंदराज यांचा वादक ब्रिजराज मिश्रा यांच्याकडे सुरू झालेले तबल्याचे शिक्षण अजोड कलावंत गोपीकृष्ण यांचा परिचयाचे कारण ठरले आणि गोपीकृष्ण यांच्याकडून कथकचे धडे मिळू लागले. त्यांच्या कल्पनेतून साकारलेली 'गणेश कल्चरल ॲकॅडमी' ठाण्यात उभारली. तिथे हजारो मुली शिकल्या. मराठीत तीन तर हिंदी तसेच इंग्रजीतही कथकची माहिती देणारी पुस्तके मंजिरी यांनी लिहिली आहेत. त्यांनी सुरू केलेले गोपीकृष्ण महोत्सव, तरुणाई संगीत महोत्सव, सितारादेवी नर्तन कट्टा यांसारखे उपक्रम ठाण्यात नावाजले गेले. अनोखे ठरले. मंजिरी देव यांना आजवर अनेक पुरस्कार लाभले असले तरी 'माझे शिक्षण अजून संपलेले नाही' अशी कोणत्याही कलाकाराला साजेशी विनम्र भावना त्या व्यक्त करतात.

*शनि. दि. १८ नोव्हें. २०१७ म.टा. वरून साभार*

# माझ्या आठवणीतील ''चेंबूर''

• सौ. मीना सदानंद मराठे, (पृ. ४१४), बांद्रा दूरध्वनी – ०२२ २६४५९५३०

*''दूरदूर त्या तिथे, गाव एक इवलासा ।*
*अंगठीतला जणू पाचू खडा हिरवासा ।''*

खरंच हिरवेगार, टुमदार छोटेसे गाव चेंबूर. त्या काळातील म्हणजे १९५४ सालचे चेंबूरचे रूप कसे होते त्याचे वर्णन असे आहे. सर्वात सुंदर, रचनात्मक व झाडाझुडपांनी वेढलेल छोटेसे गाव म्हणजे चेंबूर.

सायनवरून चुनाभट्टीचा पूल उतरला की दोन्ही बाजूस मिठागरे होती. पुढे आल्यावर RCFकडे जाणारा मालगाडीचा रेल्वे पूल होता, तो आजही आहेच. त्या पुलाखालून पुढे आल्यानंतर चेंबूर मध्ये प्रवेश. आता जिथे ''सुमन नगर'' व ''आण्णाभाऊ साठे उद्यान'' आहे तेथे पाण्याने भरलेली खाडी होती.

थोडे पुढे आल्यानंतर ''स्वस्तिक मिल'' होती. मिलच्या कंपाऊंडला लागून एक मोकळे मैदान होते. त्या मैदानावर त्याकाळी ''सर्कस'' येत असे. मैदानाच्या समोर चेंबूर एकुलता एक! छगन मिठा ''पेट्रोलपंप'' जो आजही आहे.

अजून पुढे आल्यानंतर डाव्या बाजूस ''विजय टॉकीज'' व समोरच्या बाजूस ''भाऊराव चेंबूरकरांचा बंगला'' व त्याच्या मागे भाजीचे मळे.

पुढे आल्यावर ''चेंबूर नाका.'' चेंबूर नाक्यावर गावचा भाजी बाजार व मासळी बाजार. डाव्या बाजूला वळलात की डाव्या बाजूस ''सरकारी दवाखाना'' त्याला लागून Beggar's home. उजव्या बाजूस एक छोटीशी टेकडी. टेकडीवर फक्त एक शाळा, शाळेचे नाव ''चेंबूर हायस्कूल''.

चेंबूर नाक्यावरून पुढे गेल्यावर ''श्री दत्तात्रय कृष्ण सांडू'' यांच्या आयुर्वेदिक औषधाचा कारखाना. पुढे गेल्यावर एक आमराई. पुढे त्या आमराईचे बागेत रुपांतर झाले. ती बाग म्हणजे 'Dimond Garden' आताची ''ना. ग. आचार्य उद्यान.'' उद्यानासमोर गोल्फक्लबला जाणारी छोटीशी पाऊलवाट. उद्यानावरून सरळ पुढे देवनार, ट्रॉबेकडे जाणारा रस्ता.

आता जरा गावाचा फेरफटका करुया. पुर्वी चेंबूर हे विशिष्ट पद्धतीने वसलेले गाव होते. चेंबूर स्टेशनकडे जाणारे तीन मुख्य रस्ते होते. पहिला रस्ता चेंबूर नाक्याला डावीकडे वळलात तर सरळ चेंबूर रेल्वे क्रॉसिंगकडे जाई. दुसरा रस्ता साण्डूंच्या औषध कारखान्याजवळ डाव्या बाजूस वळलात तर सरळ गावठाण म्हणजे Hearth of Chemburकडे जाई व तिसरा रस्ता आमराईवरून डावीकडे वळलात तर सरळ चेंबूर स्टेशन जवळ जाई

चेंबूरचा पहिला रस्ता क्रॉसिंग पार करून घाटकोपरकडे जातो. दुसरा रस्ता त्याचे तेव्हा नाव होते Station Avenue Road म्हणजे आताचा डि. के. साण्डु मार्ग. चेंबूर गावातील मुख्य व महत्त्वाचा भाग म्हणजे ''चेंबूर गावठाण''. हा भाग या रस्त्याला लागून वसला आहे. हा परिसर हिन्दू वसाहत या नावाने ओळखला जाई. येथे राहणारी सर्व मंडळी सुसंस्कृत व उच्चभ्रू. येथे गणेशोत्सव, गोकुळाष्टमी, शिवजयंती असे सर्व कार्यक्रम एकजुटीने साजरे केले जात. येथे राहणारी सर्व माणसे एकमेकांच्या मदतीला धावून जात असत.

Station Avenue Road वरिल त्याकाळचे आकर्षण म्हणजे ''छोटी बाग'' आताचे डि. के. साण्डु उद्यान, तसेच चेंबूरमधील एकमेव व प्रसिद्ध हॉटेल ''सरोज'', ''भैरवनाथ रसवंती गृह'', ''गोपाळ पानवाला''.

थोडे पुढे गेल्यावर चेंबूरची सार्वजनिक विहीर ''दिवाणबावडी'' जी पाण्याने तुडुंब भरलेली असे. दिवाणबावडी समोर एक छोटीशी गल्ली तेथे लहान मुलांची शाळा ''बालविकास मंदिर'' जी आजही तेथेच आहे. शाळे शेजारी मोठे मैदान, ''गांधी मैदान'' या मैदानावर सार्वजनिक सभा, नाट्यमहोत्सव होत असे.

दिवाणबावडीवरून थोडे पुढे गेल्यावर होते, माझे माहेरघर ''जानकी निवास'' सन १९५२ मध्ये माझ्या आजोबांनी बांधलेला बंगला. माझ्या आजोबांचे नाव श्री. सिताराम कृष्ण रानडे, व आजीचे नाव जानकी. म्हणूनच आमच्या घराचे नाव ''जानकी निवास!''

जानकी निवास वरून पुढे गेल्यानंतर भूलिंगेश्वर मंदीर, चेंबूरचे जुने तळे व मग भाजी बाजार. जानकी निवास पासून उजव्या हाताने सरळ गेल्यास ''आंबेडकर उद्यान'' व मग सरळ गेल्यास चेंबूर स्टेशन.

चेंबूरचा तिसरा मुख्य रस्ता जो Dimond Garden वरून सरळ चेंबूर स्टेशनकडे जाई त्या रस्त्याचे नाव Central Avenue Road. या रस्त्यावर चेंबूर चर्च, Our Lady व St. Anthanies या दोन इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. हा परिसर ख्रिश्चन कॉलनी म्हणून ओळखला जाई.

चेंबूर वरून हुतात्मा चौकाकडे जाणारी एकमेव बस म्हणजे ८ लिमिटेड. जुन्याकाळी त्या बसचा नंबर होता G sub (जी सब)

निसर्गाच्या कुशीत वसलेले हे चेंबूर गाव, त्या काळात सिनेमा नटनट्यांच्याही डोळ्यात भरले. सुप्रसिद्ध नट राजकपूर, अशोक कुमार, ओमप्रकाश, शोभना समर्थ, ललिता पवार, किशोर साहू हे चेंबूरचे रहिवासी होते. प्रसिद्ध स्टुडिओ R.K Studio, वसंत स्टुडिओ, आशा स्टूडिओ येथेच आहेत.

डि. के. साण्डु व त्यांची पुढील पिढी आजही चेंबूरलाच राहतात. सुप्रसिद्ध वकिल वि.के. टेंबे, सुप्रसिद्ध गायिका श्रुती सडोलीकर, स्रीरोगतज्ज्ञ डॉ. सरोज पाटणकर, उच्च पदस्थ पोलीस अधिकारी मोकाशी, समाजसेविका मेधा पाटकर, संगीतकार श्रीनिवास खळे, सुप्रसिद्ध किर्तनकार व प्रवचनकार सु. ग. शेवडे व त्यांचे चिरंजीव सच्चिदानंद शेवडे, संपादक कुमार केतकर, गायक शंकर महादेवन् आजची प्रसिद्ध नटी विद्या बालन हे सर्व चेंबूरचेच रहिवासी.

लहान मुलांना जिम्नॅस्टिक व मलखांब या खेळामध्ये पारंगत करणारे ''श्री सुहास पाठारे'' व महेंद्र चेंबूरकर हेदेखील चेंबूरचेच. सुहास पाठारे यांनी सुरू केलेली ''पवन पुत्र'' व्यायाम शाळा सुप्रसिद्ध आहेच.

वरील उल्लेख केलेले सर्वजण चेंबूरची शान व मान वाढविणारे शिलेदार.

चेंबूरचा देवनारमधील डोंगर हा तर चेंबूरचा मान आहे. कारण भारताच्या रक्षणासाठी सज्ज असलेले ''भाभा अणूशक्ती केंद्र'' या डोंगराच्या कुशीत लपले आहे. डोंगराच्या एका बाजूला लागूनच Tata Institute of Social Science कार्यरत आहे.

पूर्वी चेंबूरकडे येणारी हार्बर रेल्वेलाईन मानखूर्द पर्यंत जाई. मानखूर्द हे हार्बर लाईनवरील शेवटचे रेल्वेस्थानक होते. दिवसाढवळ्या सुद्धा मानखूर्दला जाण्यास भिती वाटे, इतके ओसाड व निर्मनुष्य गाव. चेंबूरला लागून घाटला, देवनार, गोवंडी ही छोटी गावे वसली होती. चेंबूर हीच त्यांची मुख्य बाजारपेठ होती. या नजीकच्या गावच्या लोकांना शिक्षणासाठी, खरेदीसाठी किंवा मनोरंजनासाठी चेंबूरलाच यावे लागे.

पण आता सर्वच कायापालट झाला आहे. वाशीपासून पुढे नवी मुंबई स्थापन झाली. वाशी ते चेंबूर नवीन पूल बांधला गेला. वाशीच्या खाडीवरून रेल्वेचाही पूल बांधला गेला. वाशीपासून पुढे पनवेल-पुणे महामार्ग झाला. तसेच गोवा महामार्ग झाला. कोकणातले रायगड, रत्नागिरी जिल्हे रेल्वे व रस्ते या मार्गांनी जोडले गेले.

चेंबूरची रहदारी वाढली, वस्ती वाढली, अनेक सुधारणा झाल्या. पण त्याबरोबर चेंबूरची शांतता गेली. टुमदार छोटेखानी बंगल्याच्या जागी मोठे टॉवर उभे राहिले. एकोप्याने राहणारी माणसे एकमेकांना ओळखेनाशी झाली.

सुधारणांचे वरदान हे एकजुटीला शाप ठरले. माझ्या सुंदर, शांत व हिरव्यागार पाचूच्या खड्याला दृष्ट लागली हेच खरे.

❖



## अमेरिकेतील पहिले मराठी महापौर : श्री. हेमंत मराठे

अमेरिकेतील न्यू जर्सीतील वेस्ट विंडसरच्या महापौरपदी इलेक्ट्रिकल इंजिनियर असलेले श्री. हेमंत मराठे हे महापौरपदाच्या निवडणुकीत दणदणीत विजय मिळवून विराजमान झाले आहेत. तब्बल ४८ टक्के मते मिळवून या पदावर विराजमान होणारे ते पहिलेच अमेरिकन भारतीय, हो आणि अस्सल मराठी महापौर ठरले आहेत. भारतात महापौरपद हे बरेचसे शोभेचे आणि सरकारी हस्तक्षेपांमुळे फारसे अधिकार नसलेले पद झालेलं आहे. पण अमेरिकेत हे पद मानाचेच नव्हे तर मुख्यमंत्र्यांसारखे अधिकार असलेले महत्वाचे पद आहे.

श्री. हेमंत मराठे हे अतिशय उच्च विद्याविभूषित आहेत. मूळचे मुंबईतील दादर येथे राहणाऱ्या श्री.मराठे यांनी मुंबईतील आय.आय.टी मधून इलेक्ट्रिकल इंजिनियरची पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी वॉशिंग्टन विद्यापीठातून डॉक्टरेट पदवी प्राप्त केली. आपल्या प्रचारात, या शहराच्या कायापालटासाठी श्री. मराठे यांनी प्रचारात मांडलेल्या अनेक क्रांतिकारी योजना, मतदारांना पटल्याने त्यांना हा दणदणीत विजय मिळाला. तेथे या योजना अंमलातही आणून दाखवाव्या लागतात कारण ती अमेरिका आहे. निवडणूक जिंकल्यावर तेथे ''तो चुनावी जुमला होता'' असे म्हणता येत नाही.

**श्री. हेमंत मराठे यांना पुढील वाटचालीसाठी आपण मन:पूर्वक शुभेच्छा देऊ या**

# वर्षागीत काव्य स्पर्धा

## वर्षा - आपल्याच हातात...

वर्षाकाळी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे
अन्....'ये रे येरे पावसा...' आता नाही सगळीकडे
खोट्या पैशाच्या लोभाने पाऊस न पडे सारीकडे
आता कायम कोवळेच काय रखरखते उन्ह पडे
निसर्गाची किमया सारी पाऊस कमी अन् उन्हच पडे ।।१।।

रोहिणीपासून स्वातीपर्यंत नक्षत्रांची भिड पडे
कोण कशावर बसे धडपडे क्षणांत भूवर पडे
ऋतुचक्र फिरे गरगरा ग्रीष्मापासून हेमंतकडे
ग्रीष्म कायम स्थिर आहे अन् दिनदर्शिका फडफडे
निसर्गाची किमया सारी पाऊस कमी अन् उन्हच पडे ।।२।।

वसंतापासून भा. ह. खात्याचे अंदाज पत्र फडफडे
अल् निनो अन् नान्योपर्यंत तज्ञांचे लक्षच तिकडे
भूमीपुत्रांचे लक्ष मात्र पाणी साठा अन् नभाकडे
दोहोंचेही अंदाज अन् आशा, ध्यान फक्त भविष्याकडे ।।३।।

निसर्गाची किमया सारी...
का होते असे कळेना की कळले तरी वळेना
जाता उन्हाळा नेमेचि येतो पावसाळा तरी कळेना
निसर्गाची छेड काढतो मानव असूनी शहाणा
झाडे तोडा, नद्या बुजवा, चिमण्या पेटवा दणाणा ।।४।।

निसर्गाची किमया सारी...
हिरवे बाजार की हिरवे गाव, अण्णांचा गाव जरा पहाना
निसर्गाची केली संगत ते पण जरा निरखाना
पाऊस कमी पण नियोजन जास्त कोणी  न राही तहाना
पाणी नियोजन पिक नियोजन दुष्काळ काही दिसेना ।।५।।

निसर्गाची किमया सारी...
झाडे लावा, जगवा, नाचवा, धरेवर करा हिरवे गालिचे
पाऊस पाणी पडेल धबाबा भरतील पोटे शेत, जळीचे
रिमझिम पाऊस पडेल सारखा नद्यांनाही पूर चढे
पाऊस पाणी चहूकडे हो मित्रा दुष्काळ गेला कुणीकडे ।।६।।

निसर्गाची किमया सारी कराल मस्ती तर पाणी तोकडे
कराल दोस्ती, पाळाल नियम तर पाणी कधी ना कमी पडे.

– **मोरेश्वर लक्ष्मण मराठे,** सांगली

## कणकण धरेचे नखशिखांत नाहले

अंबरी मेघांचे बंध गुंफले
लक्ष मोती घननीळ दाटले
वाटते नभ अधीर जाहले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

विजांच्या चकमकी आकाश साक्षी
हर्षभरे नाचती पक्षी वृक्षी
निनाद ढगांचे क्षितिजांतून वाजले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

जल तुषार रानीवनी बागडती
पाखरे किलबिल सूर गुंफिती
साजरी पालवी फुल उमलले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

नाद झऱ्यांचा छेडतो धून
नद्या डोलती भान हरपून
डोहीचे तरंग अंतरी गुणगुणले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

हवा पर्जन्य सखा साथीला
भिजवून टाकण्या रुक्ष मातीला
प्रमोदे लताकुंज समीरासह नाचले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

उत्सव वर्षा उत्साही चालला
डोंगरदऱ्या भाली हास्य उमटले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

रिते मन ओसंडले भरूनी
सरीवर सरी ओतप्रोत झेलूनी
उल्हासे अती रोमरोम व्यापले
कणकण धरेचे नखशिखांत नाहले

– **सौ. राजश्री अविनाश मराठे,** पुणे

## पाऊस

प्रखर उन्हाने शांतशील धरित्री तापली
तेजोमय किरणांनी जल तापून त्याची वाफ जाहली
पण जर का मारली दांडी या लहरी पावसाने
मग प्रत्येकाचे डोळे लागतात गगनाकडे आशेने।।१।।

अन्नदात्याने मशागत केली, बी पेरलं शेतामधी
बळीराजा पावसाला विनवितो, 'हे प्राणदात्या, तू रे येशील कधी?'
अहाहा! एकाएकी वळवाचा पाऊस भिजवितो सर्वांना
अन् एकच तारांबळ उडते की हो, थेंब टपोरे ओंजळीत पडताना।।२।।

अनुभवलाय आपण नं, जून-जुलैमधील पाऊस असतो भलताच नखऱ्याचा
गंमत अशी की, ऑगस्ट-सप्टेंबरात मात्र गाजतो फुलधमाका याचा
अहो, आषाढातील मेघानाही प्रेमजिव्हाळा विठ्ठल रखुमाईचा
उत्साही ढगांच्या दिंडीत चाले गजर सळसळत्या सरींचा ।।३।।

मन्नाडेदादांच्या घन घन माला नभी दाटल्या, कोसळती धारा
बच्चे लोक टाळ्या पिटती, पाहून मनोहर मोरपिसारा
'बरसातमें तुमसे मिले हम' म्हणतो प्राजक्त कृष्णकमलाला
'जिंदगीभर नहीं भुलेगी वो बारीश की रात' म्हणते वीज क्षितिजाला।।४।।

नटखट काळाभोर मेघांची गर्दी आकाशी उसळली
भरदिवसा, मनात येई, इतक्या लवकर सांज कशी जाहली?
नकळत वाटते, इंद्रधनुचे सप्तरंग पुन्हा प्यावे आज मजेने
आणि वाफाळलेल्या चहासह कांदाभजी चाखावी हौसेने।।५।।

अरेरे, भाद्रपदी भक्तांचे नयन भरभरून पाणावतात
धुवाधार पावसात, जड अंत:करणाने, लाडक्या बाप्पास निरोप देतात
इतकंच काय, चिमुकले विहंगही किलबिलाट करिती घरट्यातून
जणू काही बाप्पासकट पावसासही आमंत्रित करतात, भावपूर्ण हृदयातून।।६।।

चला तर, आपणदेखील विनवूया जीवनदायी पर्जन्याला
येरे येरे पावसा, तुझ्यामुळेच स्वच्छ वातावरणात मृद्गंध दरवळला
हे सवंगड्या, भरभरून वाहू देत पाट पाण्याचे आर्त वाटांवरूनी
सकल जगतास सुखसमाधान मिळू दे तव अमृतमय सरींनी।।७।।

– **श्यामला (जाईल) पुरंदरे,** (पृ. ७५३) पुणे
भ्रमणध्वनी ९४०५८४५९८४/(०२०) २५८९८५३४

## देणगीदार व वर्गणीदार सूची (मार्च २०१७ ते ऑक्टोबर २०१७)

| **वर्गणीदार:** | |
|---|---|
| **आश्रयदाता सभासदत्व:** | रु. १०,०००/- |
| रवींद्र प्रभाकर (पुणे) | |
| **हितचिंतक सभासदत्व:** | रु. ५,०००/- |
| अनिल प्रभाकर (वडोदरा) | |
| **आजीव सभासदत्व:** | रु. ५००/- |
| कमलाकर नरहर (ठाणे), उपेंद्र दिगंबर (पनवेल), वैभव मराठे (नाशिक), शंतनू दत्तात्रेय (मुंबई), भानुदास शंकर (वडोदरा), | |
| **हितगुज सभासदत्व:** | रु. २०००/- |
| कमलाकर नरहर (ठाणे), उपेंद्र दिगंबर (पनवेल), अनामिक, शंतनू दत्तात्रेय (मुंबई), रवींद्र प्रभाकर (पुणे), देवयानी दिक्षित (पुणे), स्मिता कोलटकर (मुंबई), विष्णू सखाराम (मुटाट), अनिल प्रभाकर (वडोदरा), भानुदास शंकर (वडोदरा) | |
| **हितगुज सभासदत्व:** | रु. १०००/- |
| अविनाश दत्तात्रय (पुणे) | |
| **हितगुज सभासदत्व:** | रु. ५००/- |
| मोरेश्वर लक्ष्मण (सांगली-दोन वेळा), | |

| **देणगीदार:** | |
|---|---|
| **शिक्षण निधी देणगी** | |
| श्रीनिवास अनंत (मुंबई) २०,०००/-, कमलाकर नरहर (ठाणे) २,५००/- विष्णू सखाराम (मुटाट) १,०००/- , अनंत मराठे (मुंबई) ४००/- | |
| **अन्य कार्यासाठी देणगी:** | |
| **पंचाहत्तरी महोत्सव:** | |
| चिंतामण त्र्यंबक (कळवा) | १,०००/- |

सूत्रधार – सौ. आदिती मराठे मो. ९९६७५८४५५९

**तळ्यात मळ्यात**

**प्रस्तुत**
**गंमत –जंमत**
**मनोरंजक – कार्यक्रम**

पत्ता – A १०१, श्री गणेश दर्शन सोसायटी, नगरपालिकेच्या जवळ.
पनवेल रायगड – ४१० २०६.

# शैक्षणिक पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांची सूची – २०१७

| अनु | नाव | विद्यापीठ/मंडळ | परिक्षा | गुण | पैकी | टक्के | पारितोषिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गिरीजा संजय मराठे-भारतीय, अमरावती | महाराष्ट्र युनिवर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस | आयुर्वेद वाचस्पती | | | पी.एच.डी | १५०० |
| २ | साध्वी आनंद मराठे, राजापूर | पुणे विश्वविद्यालय | M.A. संस्कृत | ९५५ | १२०० | ७९.५८% | १५०० |
| ३ | संजना श्रीपाद मराठे, भोपाळ | राहुल गांधी प्रौद्योगिकी विश्वविद्यालय, भोपाळ | B.E. | Grade | → | ८.९४ | १२०० |
| ४ | मनाली श्रीकांत मराठे, पडेल | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १२ वी (कॉ) | ५४३ | ६५० | ८३.५४% | ८०० |
| ५ | मंदार श्रीरंग खांबेटे, टिटवाळा | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १२ वी (कॉ) | ४७६ | ६५० | ७३.२३% | ७०० |
| ६ | रिया कमलेश मराठे, डोंबिवली | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १२ वी | ५७८ | ६५० | ८८.९२% | ८०० |
| ७ | सानिका योगेश रानडे, मुंबई | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १० वी | ५०० | ५०० | १००.००% | १००० |
| | | दहावीत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास-कै. कु. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक | | | | | ५०० |
| | | दहावीत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास-माधुरी प्रमोद मराठे स्मृती पारितोषिक | | | | | ४५० |
| ८ | मेधा वासुदेव दांडेकर, मिरज | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १० वी | ४४६ | ५०० | ८९.२०% | ८०० |
| ९ | स्वराली माधव मराठे, पुणे | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १० वी | ४४३ | ५०० | ८८.६०% | ८०० |
| १० | वरूण योगेश गाडगीळ | महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण मंडळ | १० वी | ४५३ | ५०० | ९०.६०% | १००० |
| ११ | श्रीया प्रदीप मराठे, गोवा | गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | १० वी | ५१६ | ६०० | ८६.००% | ८०० |
| १२ | प्राची हेमंत मराठे, नालासोपारा | पाँडिचेरी युनिवर्सिटी | M.Sc (मरीन बायॉलॉजी) | १७०८ | २२०० | ७७.६४% | १५०० |
| १३ | भारती मराठे-गुप्ता | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ | M.Arch | ८८७ | १२०० | ७३.९२% | १५०० |

## : अत्यंत कळकळीची विनंती :

आपण सभासदत्त्व शुल्क अथवा देणगी दिली असूनही आपलं नाव या यादीत नसल्यास/आपल्याला पावती मिळाली नसल्यास **कोषाध्यक्ष श्रीनिवास मराठे (भ्रमणध्वनी ९८३३२१६४६८)** यांच्याशी संपर्क साधावा.

प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, **'मराठे प्रतिष्ठान'** या नावाने **IDBI बँक,** दादर-प, या शाखेतील **बचत खाते क्र. ०५०११०४००००४३५१९** मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता. वरील खाते क्र. १६ आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते. अशा प्रकारे रक्कम प्रतिष्ठानच्या खात्यात जमा केल्यावर आपले नाव, पत्ता, रक्कम भरल्याचा दिनांक, चेक/NEFT/IMPS/मोबाईल बँकिंग द्वारे दिली असल्यास त्याचा नंबर/संदर्भ क्र. तसेच ज्या कारणाने रक्कम भरली ते कारण आदी माहिती admin@marathepratishthan.org या ई-मेल वर अवश्य कळवावी म्हणजे पावती देणे सोपे होईल.

# संवाद कुलबांधवांशी

कुलबांधव व भगिनींना नमस्कार,

आपण सप्टेंबर २०१७ वाचला असेलच. हितगुजचे रुपडे बदलत आहे, नवनवीन लेखक लिहू लागलेत. काही ना काही उपक्रम आपण वर्षभर घेऊ लागलो आहोत. यंदाची वार्षिक सर्वसाधारण सभादेखील खुपच उत्साहात पार पडली. उपस्थितीही चांगलीच होती. यावेळचे वेगळेपण म्हणजे बऱ्याच वर्षांनी गुणवत्ता पारीतोषिके घेण्यासाठी बरीच मुले आपल्या पालकांसह उपस्थित होती. एकदम खेळीमेळीच्या वातावरणामधे सभा संपन्न झाली.


मंडळी आपल्यापैकी बरेचजणं कुलव्रुत्तांता संबधी चौकशी करत असतात. आपला याअगोदरचा कुलवृत्तांत १९९१ साली प्रकाशित झाला होता. यानंतर आता २६ वर्षे झाली, या कालावधीत परीवारांमध्ये बरीच नविन मंडळी समाविष्ट झाली असतील व काहींनी निरोपही घेतला असेल. या सर्वांच्या नोंदी करणे फक्त कार्यकारीणी सदस्यांना शक्य होणार नाही. यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. प्रत्येक घराण्यातील तीन चार कुलबांधवांनी पुढाकार घेतला तर काही महिन्यांमधे एक एक करुन सगळी घराणी सुधारित पद्धतीने नोंद होतील. हे सामाजिक काम आहे, तेव्हा स्वखुशीने आपला अमुल्य वेळ समाजासाठी दिलात तर एक मोठ्या कामाचे तुम्ही भागीदार व्हाल. एकदा ही पूर्ण सुधारित माहिती जमा झाली की संगणकीकृत करणे सोपे जाईल.

मंडळी, जानेवारी २०१६ रोजी सांगली येथे झालेल्या मराठे प्रतिष्ठानच्या दहाव्या अ.भा. संमेलनामधे बडोदा येथील कुलबांधव श्री. मोहन मराठे यांनी पुढील अकरावे अ.भा. संमेलन बडोदा येथे घेऊ असे सांगितले होते. तेथून बडोद्याला गेल्यानंतर तेथील मंडळींच्या वेळोवेळी बैठका घेऊन वर्षभरात त्यांनी सदर संमेलनाची तारीख जाहीर केली. सप्टेंबरच्या अंकामधे ती कळवली आहेच. ७ जानेवारी २०१८ रोजी बडोदे, गुजरात येथे हे संमेलन होत आहे. सर्व कुलबांधवाना हे आमचे आवाहन आहे की मोठ्या संख्येने आपण सर्व या संमेलनाला उपस्थित राहून आयोजकांच्या उत्साहाला उधाण येऊदे व आपले प्रतिष्ठान सर्वदूर पसरू दे.

आपल्या या संमेलनाला बँक ऑफ महाराष्ट्र चे श्री.रविंद्र मराठे व ठाणे शहराचे प्रथम महापौर श्री. वसंतराव मराठे उपस्थित रहाणार आहेत. आपले संमेलन नावाप्रमाणेच अखिल भारतीय असते व यावेळीतर राज्याबाहेर पुन: एकदा हे संमेलन होत आहे. याला महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक, उत्तर प्रदेश, गया(बिहार) इथपासून कुलबांधव उपस्थित रहाणार आहेत. अशा या महत्त्वपूर्ण संमेलनाला आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. लवकरात लवकर तिकिटे आरक्षित करुन बडोदा येथे आपली उपस्थिती वेळेत कळवावी म्हणजे आयोजकांना सोयिचे होईल. या संमेलनानिमित्त एक स्मरणिका देखील काढण्यात येणार असून त्यामध्ये जाहिराती छापण्यात येणार आहेत. आपल्या कुलबांधवांपैकी कोणाला जाहीरात छापायची असल्यास संपर्क साधावा.

मंडळी, ही संमेलने, विभागीय मेळावे आपण वारंवार का घेतो? सध्याच्या धकाधकीच्या जीवनामधे आपणा सर्वांना खुपच ताणतणावांना तोंड द्यावे लागते, तर ही संमेलने म्हणजे एक कौटुंबिक सोहळाच असतो. यामधे खुप वर्षांनी बरेच जणं एकमेकांना भेटतात. काही वेळा बरीच वर्ष एकमेकांच्या संपर्कात नसलेल्या व्यक्ती एकमेकांसमोर येतात. त्यावेळचा त्यांच्या चेहऱ्यावरील दिसणारा आनंद अवर्णनीय असतो. अशा संमेलनाचा शेवट खुपच ह्रदयद्रावक असतो. कोणाचाही पाय तेथून निघत नसतो. पुन: पुन्हा भेटण्याचा वायदा घेतला जातो. आम्हालाही परत लवकर संमेलन आयोजित करा अशी आग्रही मागणी होते. तर आम्ही सर्वजण या बडोदा संमेलनाची आतुरतेने वाट पहात आहोत. तेव्हा आपण सर्व आता प्रत्यक्ष भेटूच. तोपर्यंत मी आपली रजा घेतो. धन्यवाद! ❖

## सहवेदना



पुण्यातील सुप्रसिध्द ‘मराठे ज्वेलर्स’ चे संचालक सर्वश्री. मिलिंद व कौस्तुभ मराठे व श्री. चंद्रकांत मराठे यांच्या मातोश्री, मिरज येथील प्रसिद्ध उद्योगपती व मराठे टेक्सटाईल मिल्स चे संचालक श्री. अरविंद मराठे यांच्या सुविद्य पत्नी तसेच पुणे येथील लक्ष्मण वासुदेव गाडगीळ, सराफ यांच्या कन्या सौ. नलिनी यांचे दि. ८ ऑक्टोबर २०१७ रोजी मिरज येथे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या.

मिरज येथील पटवर्धन हॉल येथे दि. १० ऑक्टोबर रोजी झालेल्या प्रार्थना सभेत शहरातील प्रतिष्ठितांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. पुण्यातील शोकसभा दि. १२ ऑक्टोबर रोजी झाली. मराठे प्रतिष्ठान श्री. अरविंद मराठे व कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो हीच त्या जगन्नियंत्याच्या चरणी विनम्र प्रार्थना.

# आठवणीतील कठीण प्रसंग, मुंबईतील महापूर २६ जुलै २००६

• कुमुद मराठे डोके, (पृ. ३६६), ठाणे

आज २६ जून २०१७. गेले दोन दिवस सर्वदूर पावसाची हजेरी जोर धरते आहे. आकाश काळ्या ढगांनी भरून गडगडाटा सोबतीने लखलखाटही डोळे दिपवितो आहे. वीजपुरवठा नेमाने गायब आहे. अकरा वर्षापूर्वी २६ जुलैला मुंबईला असेच पावसाने झोडपले. जनजीवन विस्कळीत नव्हे, उध्वस्त केले. त्या प्रसंगाची ही आठवण.

दोन दिवस संततधार चालू होती, पण सकाळी थोडी उघडीप झाल्याने ठाणे ते डोंबिवली लोकलने जाऊन ड्युटी करायची ठरविले. उपवन ठाणे (प.) ते ठाणे स्टेशन पाऊण तास किमान. पुढे ११.१०ची कल्याण लोकल पकडली. मात्र हायसे वाटते न वाटते तोच मुंब्र्यात ती रखडली. पुढे जाण्याचे लक्षण दिसेना. धडाधड सर्वांनी खाली उड्या मारल्या व खुशाल चालायला लागले. बापरे! मी पण क्षणाचाही विलंब न करता धीटाईने उडी मारली. सर्वांच्या सोबतीने चालू लागले. खाडी पुलाखालून लालमाती मिश्रित पाण्याच्या उचंबळणाऱ्या लाटा, घो घो घोंगावणारा वारा असा भितीयुक्त वातावरणात दिवा स्टेशन गाठले. प्लॅटफॉर्मच्या विरुद्ध बाजूने एका उभ्या ट्रेनमध्ये प्रवाशांना विचारून त्यांच्याच मदतीच्या हाताला धरून डब्यात शिरले. डोंबिवली स्टेशन आले. मोठ्या आस्थेने खाली उतरून झपाझप शाळेत पोहोचलो. मधल्या सुट्टीपूर्वी ४० मिनिटे आधी मस्टरवर सही करण्यास मिळाली.

माझ्याप्रमाणेच ठाण्याहून डोंबिवलीत शाळेसाठी येणाऱ्या तीन शिक्षिका व एक शिपाई होता. संध्याकाळी डोंबिवलीच्याच स्वतःच्या घरी विश्रांती घेतली. विशेष म्हणजे टेलिफोन सेवा सुरळीत होती. ठाण्याच्या घरच्यांना खुशाली कळवली. एवढ्या पाण्यातून वाट काढत, मोटर गाड्यांना ढकलत मार्गक्रमण करणाऱ्या मुंबईकरांच्या जिद्दीला सलामच करायला हवा. सत्तरीकडे झुकलेल्या मला ही आठवण आजही आश्चर्यचकीत करते. हे धाडस आपण कसे केले याचेच राहून राहून नवल वाटते. म्हणतात ना, देव तारी त्याला कोण मारी... ❖

---

# सातासमुद्रापार झेंडा - हेमंत मराठे

हेमंत मराठे यांनी नोकरी करता करता आपला व्यवसाय अमेरिकेत सुरू केला आणि ते तिथेच स्थायिक होऊन गेले. तिथे नागरिकत्व घेऊन आपले बस्तान बसवले आणि आपल्या परिसरात मराठी माणसाच्या स्वभावानुसार सामाजिक कार्य सुरू केले. त्यातूनच त्यांच्यावर एकामागून एक जबाबदाऱ्या येत गेल्या. न्यू जर्सी राज्यात वेस्ट विंडसर या शहरात त्यांचे वास्तव्य आहे. तिथे त्यांनी शालेय शिक्षणाच्या बाबतीत अनेक पावले उचलली आणि मग स्कूल बोर्डाचे अध्यक्ष ही जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्यांनी नुसता अभ्यासक्रम व व्यवस्थाच बघितली नाही, तर मुलांच्या संगोपनाला दिशा देण्यातही पुढाकार घेतला. त्यामुळे या शहरातील शाळा आज उत्तम संस्कार व शिक्षण देणाऱ्या मानल्या जातात. त्या शिक्षण व्यवस्थेलाही त्यांनी आर्थिक पायावर भक्कमपणे उभे केले. त्यामुळेच अल्पसंख्य अशा भारतीय वंशाचे असूनही स्थानिक नागरिकांचा त्यांना भरपूर पाठिंबा मिळालेला आहे. अमेरिकेत महापौर म्हणजे त्या शहराचा सर्वाधिकारी व राजकीय कारभारीच असते. त्याच्या कक्षेत पोलिस व अन्य विभागही येत असतात. योगायोग बघा. ज्या मुंबईत मराठे यांचे बालपण, तरुणपण गेले, तिथे आज ज्या तक्रारी आहेत, त्याच वेस्ट विंडसर शहरातही आहेत. त्यांनाच मार्ग लावण्याचे आश्वासन देऊन मराठे यांनी बाजी मारलेली आहे. उत्तम रस्ते, चांगले पर्यावरण अधिक मोकळ्या भूखंडांचे संरक्षण व विकास; हा मुद्दा निर्णायक ठरला. कारण, अतिरिक्त बांधकामे व त्यामुळे विस्कटणारे पर्यावरण, त्याही भागातली मोठी समस्या झालेली आहे. आपण त्याला पायबंद घालू असे ठामपणे सांगत, मराठे यांनी सातासमुद्रापार मराठीचा झेंडा रोवला आहे. आपली पत्नी व चार मुलींसह त्यांचे गेली तीन दशके तिथेच वास्तव्य असून, नव्या कामात त्यांनी यश संपादन केल्यास, पुढल्या काळात हा मराठी माणूस अमेरिकन संसदेतही पोहोचू शकेल. कारण, अवघ्या २५ टक्के आशियाई वस्ती व त्यात तुरळक भारतीय व मराठी लोक असतानाही या व्यक्तीने इतकी मजल मारलेली आहे. न्यूयॉर्कनजीकचे राज्य म्हणून विंडसरसारख्या लहान शहरांचा बेताल विकास, ही त्या भागातील समस्या झाली आहे आणि त्याच्याविरोधात ठामपणे उभे राहण्याचे श्रेय म्हणून मराठे यांना महापौरपद लाभलेले आहे.

***(दैनिक पुढारी दि. १५ नोव्हेंबर २०१७ साभार)***


***प्रेषक : श्रीपाद नारायण मराठे, कोल्हापूर***

# पन्नाशीत पन्नास किल्ले

• डॉ. श्री. चंद्रशेखर चिंतामण मराठे, (पृ. २४८), पनवेल भ्रमणध्वनी – ९८६००२८२३८

वयाची पन्नाशी ओलांडल्यावर एखादा नवीन उपक्रम हाती घ्यावा असे सारखे वाटत होते. एखादा सायकल प्रवास, पुस्तक लेखन, समाजकार्य, अशा अनेक पर्यायां वर विचार करताना एक प्रयत्न म्हणून पनवेल जवळच्या माथेरानच्या डोंगरावर रविवारी गेलो. आधी खूप दुर्दम्य वाटणाऱ्या चढणीवरून घरी परतल्यावर दोन दिवस पाय आणि पाठ खूप दुखत होती, पण नंतर एकदम सर्व वेदना नाहीशा झाल्या. पुढच्या रविवारी अलिबाग जवळचा सागरगड सर केल्यावर मला साहसी उपक्रमाचे नाव सुचले ते पन्नाशीत पन्नास किल्ले. वर्षातील ४८ रविवार सुट्टीचे धरून आपण एका वर्षात ५० किल्ले सहज करू असे धोपट गणित जमल्याने नवीन हुरूप आला. मग काय, तयारीला लागलो. ५० किल्ल्यांची तारीखवार यादी करून भिंतीवर टांगली, ट्रेकिंगचे साहित्य जमवू लागलो आणि ठरल्याप्रमाणे किल्ले करीत गेलो. फक्त काही नियम ठरवून घेतले होते ते म्हणजे फक्त उंच डोंगरावरील किल्ले करायचे, कोणत्याही किल्ल्यावर एकट्याने जायचे नाही आणि कोणताही नियम मोडायचा नाही.

सुधागड किल्ला पाहिल्यावर तेथील महादरवाजा आणि तटबंदी पाहिल्यावर थक्क झालो. तेथील वस्तूबद्दल कुतूहल जागृत झाले आणि ह्यापुढे किल्ले पाहायचे तर त्याची संपूर्ण माहिती मी ''सांगती'', प्र. के. घाणेकरांची आणि भगवान चीलेंची पुस्तके GoogleMaps, Trekshitiz.com वरून घेऊ लागलो. किल्ल्यावरील पायवाटांची, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, ऐतिहासिक वस्तूंची नावे, शिलालेखांची माहिती, तिथला इतिहास, गुप्त दरवाजे वगैरेची माहिती करून किल्ला पाहणे म्हणजे ओळखीच्या व्यक्तीला बऱ्याच वर्षानंतर भेटल्यासारखे वाटू लागले. हे किल्ले पाहण्यासाठी जास्त खर्चही येत नसे. बहुसंख्य किल्ले लोणावळा, जुन्नर, इगतपुरी, कर्जत, साताराच्या जवळ असल्याने शनिवारी रात्री प्रवास करून किल्ल्याच्या पायथ्याजवळील गाव गाठायचे, पहाटे गावातीलं हॉटेलमध्ये मिसळ–पाव किवा पोहे ढकलून थेट किल्ल्याची वाट धरायची आणि दुपारपर्यंत किल्ला पाहून रविवारी रात्री परत घरी यायचे, असा कार्यक्रम आखू लागलो. नेट वर तर तारीखवार किल्ल्यांचे ट्रेक करणाऱ्या संस्थांची नावे तपशिला सह पाहून ट्रेकची आखणी करू लागलो. मी अनेक अनोळखी ग्रुपबरोबर ही ट्रेकिंग केले आहे पण, कुठेही वाईट अनुभव आला नाही. कारण ह्या ग्रुप्समधील ट्रेकिंगचे नियम कडक असल्याने टिंगल–टवाळी करणारी आणि व्यसनी मंडळी ह्या पासून लांबच राहतात.



ग्रामीण भागातही ट्रेकिंग करणाऱ्या मंडळीबाबत आदर आणि कुतूहल असल्याचे आढळले. अनेकांसाठी ते एक रोजगाराचे नवीन साधन झाले आहे. किल्ल्यांची साफसफाई, जुन्या वस्तूंचा जीर्णोद्धार, पायावाटांची दुरुस्ती, पाण्याच्या टाक्या साफ करणे, नाव फलक लावणे सारख्या अनेक सुधारणा करण्यात पर्यटन, पुरातत्त्व, वनखाते आणि स्थानिक गड संवर्धन संस्था पुढे आल्या आहेत त्यामुळे किल्ले पाहणे अधिक सोपे आणि आनंददायी झाले आहे.

शिवाजी महाराजांनी पावन केलेले सुमारे ३५० किल्ले महाराष्ट्रासाठी एक अमूल्य ठेवा ठरला आहे. पट्टा गडावरील झोंबणारा थंड वारा, रतनगडा वरील सोनकीच्या फुलांचे ताटवे, केंजळ गड आणि इंद्राई किल्ल्यावरील कातळ कोरीव पायऱ्या, साल्हेर–मुल्हेरचे दगडात कोरून काढलेल्या पायवाटा, कमळगडा वरील ४० फुटी शाडूची विहीर, हरिहर किल्ल्याच्या उभ्या पायऱ्या, अंकाई–टंकाई किल्ल्यावरील कोरीव शिल्प, राजगडावरील अरुंद माचीची रचना, अलंग–कुलंग–मदनच्या चढाईतील थरार हे सर्व किती विलक्षण आहे ह्याचा अनुभव तर प्रत्यक्ष किल्ल्याला भेट दिल्याशिवाय येणे शक्य नाही.

माझे वर्षभरात ५० नाहीतर ६४ किल्ले पाहून झाले पण माझे किल्ले–भ्रमंती अजूनही चालूच आहे. ट्रेकिंगमुळे माझी लहान–सहान शारीरिक दुखणी कमी तर झाली, डॉक्टरच्या गाठी–भेटीही कमी झाल्या आणि अनेक ट्रेकर मित्रांबरोबर ट्रेकिंगच्या तारखा ठरू लागल्या आहेत. अजूनही नवीन किल्ला पाहताना काहीतरी नवीन पाहायला–अनुभवायला मिळतेच. प्रत्येक किल्ल्याचे स्वरूपही ऋतुप्रमाणे बदलणारे असते. रविवारी घरी कोच वर रेलून टीव्हीचे चॅनेल बदलण्यापेक्षा उंच किल्ल्यावर बसून निसर्गाशी केलेला संवाद अजूनही मला खुणावत असतो आणि माझे मन नकळत मित्राचे ट्रेकिंगसाठी आलेल्या फोनवर तारीख पक्की करू लागते. ❖

# राजबागेची सफर

• श्री. माधव वासुदे मराठे, (पृ. ३८६), पनवेल भ्रमणध्वनी – ९०२२४१७०२१

**म**राठे प्रतिष्ठान पुणे शाखेच्या काही सभासदांनी आपल्या कुटुंबियांसह एक दिवसाची सहल सप्टेंबरमध्ये आयोजित केली होती. सकाळी ७ वाजता सगळे छोट्या बसने निघाले व प्रथमतः सकाळच्या मंगलसमयी थेऊर येथील गणेशाचे दर्शन सर्वांनी घेतले. लवकर गेल्यामुळे सर्वांना शांतपणे दर्शन घेता आले. तिथेच चहापान होऊन गाडी लोणी येथील राजबागेकडे निघाली.

प्रख्यात चित्रपट निर्माता, दिग्दर्शक व अभिनेता राज कपूर याने अत्यंत रम्य अशा मुळा नदीच्या काठावर ही बाग विकसित केली. अनेक वर्ष हा नायक आपल्या चित्रपटांची रूपरेखा या ठिकाणी करत असे व नंतर मुंबई येथील RK स्टुडिओ येथे चित्रण करीत असे; तसेच आउटडोर शुटिंग या बागेत करीत असे. आज हा संपूर्ण परिसर MIT चे संस्थापक श्री कराड यांचेकडे असून त्यांनी येथे निरनिराळ्या विषयांची महाविद्यालये सुरू केली असून विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहेही सुरू केली आहेत. तरी पण राज कपूर याने विकसित केलेली बाग अतिशय व्यवस्थित ठेवली आहे.

या बागेत जाण्यासाठी असलेले प्रवेश मूल्य भरून सकाळी १० वाजता या बागेची सफर सुरु झाली. दादासाहेब फाळके यांचा पुतळा प्रवेशदारावर आहे. तसेच आत गेल्यावर नटराजाची भव्य मूर्ती पाहायला मिळते. येथे एक प्रशस्त भोजनगृह असून तिथे आमची नाश्त्याची व चहा-कॉफीची सोय केली होती. या गृहाभोवती प्रशस्त बाग असून त्यात कलात्मक पुतळे उभे केले आहेत.

नंतर आत गेल्यावर राज कपूर व त्याची पत्नी कृष्णा यांचा पुतळा असून त्याच्या भोवती राज कपूर बरोबर काम केलेल्या नायिकांचे पुतळे आहेत. येथे अनेक दालने असून त्यात प्रख्यात अभिनेते व अभिनेत्रीचे पुतळे व छायाचित्रे व्यवस्थितपणे मांडलेली आहेत. मराठीतील दादा कोंडके यांचाही पुतळा व छायाचित्रे पाहण्यास मिळाली. एका दालनात लता मंगेशकर, अशा भोसले, मुकेश, महंमद रफी, मन्नाडे वगैरे गायक-गायिकांचे, तसेच संगीत दिग्दर्शकांचे पुतळे व छायाचित्रे मांडलेली असून तिथे त्यांची गाणीही ऐकायला मिळतात.

एका दालनात खलनायकांचे पुतळे व छायाचित्रे ठेवली असून त्यांच्या चित्रपटातील गाणी ऐकवली जातात. येथे एक मिनी-थिएटर असून त्यात राज कपूरच्या चित्रपट जीवनावर तयार केलेला अर्ध्या तासाचा चित्रपटही दाखवण्यात आला.

दुपारचे जेवण सर्वांनी विद्यार्थ्यांबरोबरच घेतले. या नंतर


सहलीचा आनंद लुटणारे कुलबांधव-कुलभगिनी

पहिल्या मजल्यावर निरनिराळ्या दालनात भारतीय व परदेशी वाद्ये, तंतूवाद्ये, तालवाद्ये ठेवली असून त्या त्या वाद्यांच्या माहितीचे फलकही लावण्यात आले आहेत. अनेकांना नवनवी वाद्ये पाहण्यास मिळाली तर काहींनी तालवाद्ये वाजवण्याचा आनंदही घेतला. नदीकाठी सप्तऋषींच्या पर्णकुट्या तयार केल्या असून आत त्यांचे पुतळे व त्यांच्या माहितीचे फलकही आहेत.

अशीही राजबागेतील सफर दुपारी चहा पिऊन संपवली.


त्यानंतर सर्वजण यवत येथील डोंगरावरील पुराणकाळी उभारलेल्या भुलेश्वर मंदिराकडे निघाले. मंदिरावरील व आतील कोरीव काम पाहण्यासारखे आहे. तेथून परत येताना उरळीकांचन येथील रामदरा येथील मंदिरात दर्शन घेऊन रात्री ८ वाजता सर्वजण पुण्यात परतले.

रोजच्या जीवनचक्रातून बाहेर पडून काही चांगले पाहिल्याचा आनंद सर्वांना मिळाला व सहलीची उत्तम व्यवस्था ठेवल्याबद्दल श्री विजय मराठे यांचे सर्वांनी कौतुक केले. ❖

## अभिनंदन अभिनंदन अभिनंदन

ऑल इंडिया रेडियोच्या म्हणजेच आकाशवाणीच्या शास्त्रीय संगीताच्या स्पर्धेत सर्व केंद्रांमधून ठाणे येथील पं. संजय रामचंद्र मराठे यांची सुकन्या प्राजक्ता मराठे-बिचोलकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सौ. प्राजक्ता ही सुप्रसिद्ध गायक की. रामभाऊ मराठे यांची नात असून पं. केदार बोडस यांची शिष्या आहे. या तिच्या यशाचं श्रेय ती आपले गुरु, वडील पं. संजय राम मराठे तसेच पती सिद्धेश व सासरच्या कुटुंबियांना देते. संगीत नाटक मृगरंजीनी मध्ये तिने भूमिका केली आहे. तसेच राम मराठे यांनी संगीत दिलेल्या की. विद्याधर गोखले यांच्या मंदारमाला या संगीत नाटकातही तिने भूमिका केली आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी '**मराठे प्रतिष्ठान**'तर्फे हार्दिक शुभेच्छा.

# साभार पोच




## श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत


**मूळ ग्रंथ रचियता :** तेलगू प्रत उपलब्ध श्रीशंकर भट श्रीमल्लदी गोविंद दीक्षितुक, श्रीवरम

**संशोधित मराठी अनुवाद :** सौ. शुभदा रवींद्र मराठे, इंदुर ए/३५६, 'परिश्रांति', शालीमार बंगलो पार्क, सुखालिया, इंदौर ४२५ ०१०. भ्रमणध्वनी ०९८२६०४०९३८/०९७५४९०३५५१

**पृष्ठसंख्या :** ४३२ मूल्य रु. १९९

**प्रकाशन :** दि. ३० ऑक्टोबर २०१७

**प्रकाशक :** श्रीपादश्रीवल्लभ महासंस्थान - पिठापूर




## सावरकरांच्या आठवणी

**लेखिका** : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे

**प्रकाशक** : स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर (प.), मुंबई - ४०००२८
दूरध्वनी - ०२२-२४४६५८७७

**पृष्ठसंख्या** : २०

**मूल्य** : २० रुपये


## 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

**अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, वर्षस्मृतिदिन, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.**

**पाव पान रु. ६००/-, अर्धेपान रु. १२००/-, पूर्ण पान रु. २५००/-**

**रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने बँकेत जमा करावी. तसे कळवावे.**

**IDBI BANK दादर शाखा सेव्हिंग खाते क्र. 0501104000043519**


**BOOK POST**

<u>**If undelivered, Please return to**</u>

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**